# संविधान म्हणजे काय?

माणूस नेहमी समूहात जगत असतो. हे समूह वेगवेगळ्या प्रकारचे असू शकतात. आपण कुटुंबात, मित्रमंडळीत जगत असतो. असे समूह व्यक्तीला ओळख आणि किमान सुरक्षा देतात पण तरीही व्यक्तीचे आणि समूहाचे (समष्टीचे) नाते तसे तणावाचेच असते. समूहाचे निर्णय आणि व्यक्तीची स्वतःची इच्छा यात जेव्हा जेव्हा विसंगती येते तेव्हा हा तणाव निर्माण होतो. पण समूहात जगणे म्हणजेच समष्टीच्या सोबत राहणे ही व्यक्तीची अपरिहार्यता नसली तरी गरज असते. व्यक्ती आणि समष्टी (समूह) यांच्या नात्यात प्रयत्नपूर्वक संतुलन निर्माण करावे लागते. असे संतुलन बनविण्याचे शास्त्र म्हणजे संविधानवाद असे म्हणता येईल.

आधुनिक काळातील सर्वांत मोठी आणि महत्त्वाची समष्टी म्हणजे राष्ट्र-राज्य. राष्ट्रात राहण्यार्या व्यक्ती-व्यक्ती मधील संबंध आणि व्यवहार सुरळीत व्हावेत यासाठी राज्यव्यवस्थेने (शासनाने) काही निर्णय घ्यावेत अशी जेव्हा अपेक्षा आपण करतो तेव्हा आपण त्या राज्यव्यवस्थेस मान्यता देत असतो. नागरिक जेव्हा निवेदन अथवा मोर्चाद्वारे राज्यव्यवस्थेकडे एखादी मागणी करत असतात तेव्हा त्या व्यवस्थेची अधिमान्यता निश्चित होत असते. नागरिक आंदोलनाद्वारे राज्यव्यवस्थेकडे मागणी भलेही अधिकारांची अथवा स्वातंत्र्याची करत असतील पण ती मागणी करत असतानाच ते नागरिक त्या राज्यव्यवस्थेकडून शासित होणे मान्य करत असतात.राज्यव्यवस्थेकडून जितक्या जास्त अपेक्षा आपण करतो तितकी ती व्यवस्था अधिक ताकदवान बनत असते. त्यातूनच अशी राज्यव्यवस्था क्रमशः निरंकुश आणि दमनकारी बनण्याचा धोका असतो. सर्व नागरिकांचे अधिकार वा स्वातंत्र्य अबाधित राहावेत ही जबाबदारी पार पाडताना राज्यव्यवस्था जे काही निर्णय करेल ते निर्णय एखाद्या-दुसर्या नागरिकाच्या इच्छेवर गदा आणणारे असू शकतात. पण बहुमताने सत्तेवर आलेली राज्यव्यवस्था जेव्हा अप्रामाणिक बनते किंवा फक्त

विशिष्ट गटांच्या हितरक्षणासाठी भेदभाव करणारी बनते अथवा आपले शासन अनिर्बंध आणि चिरकाल टिकविण्यासाठी धडपडणारी बनते तेव्हा प्रश्न निर्माण होतात. नागरिकांचे अधिकार व स्वातंत्र्य टिकविण्याची जबाबदारी पार पाडण्याकरिता राज्यव्यवस्थेची अधिमान्यता निर्माण व्हावी लागते पण त्याचवेळी त्यातून ती राज्यव्यवस्था निरंकुश आणि दमनकारी बनू नये ही काळजीही घ्यावी लागते. नेमके हे काम संविधान करत असते. संविधान एका बाजूला राज्यव्यवस्थेची अधिमान्यता प्रस्थापित करते आणि दुसर्या बाजूला ती राज्यव्यवस्था बेलगाम व नागरिकांचे अधिकार हिरावून घेणारी बनणार नाही याची काळजी घेते. यालाच उदारमतवादी संविधानवाद असेही म्हणतात.

• •

# भारताचे संविधान कसे आणि कधी बनले?

भारताला स्वातंत्र्य मिळण्यासाठी ब्रिटिश सरकारबरोबर दीर्घकाळ लढा झाला आणि त्यांच्याबरोबर वाटाघाटींचे सत्रही सुरू राहिले. त्याच्याच एका टप्प्यावर ब्रिटिश सरकारने पाठविलेल्या कॅबिनेट मिशनने भारतात घटनात्मक राज्यपद्धती आणण्यासाठी संविधानसभा निवडण्याचा निर्णय घेतला. कॅबिनेट मिशनने प्रस्तावित केल्याप्रमाणे 1946 साली प्रांतिक विधानमंडळावर निवडून आलेल्या सदस्यांनी मतदान करून संविधानसभेसाठी एकूण 383 सदस्य निवडले. या संविधानसभेची पहिली बैठक 9 डिसेंबर 1946 या दिवशी दिल्लीत झाली. मुस्लीम लीगने या बैठकीवर बहिष्कार टाकला होता. 11 डिसेंबर 1946 च्या संविधानसभेच्या बैठकीत सभेचे अध्यक्ष म्हणून डॉ. राजेन्द्र प्रसाद यांची निवड करण्यात आली. संविधानाचा मसुदा तयार करण्यासाठी मसुदा समितीची निवड करण्यात आली. या मसुदा समितीच्या पहिल्या बैठकीत 29 ऑगस्ट

1947 ला मसुदा समितीचे अध्यक्ष म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची निवड करण्यात आली. भारत सरकारच्या राजपत्राद्वारे घटनेचा मसुदा जनतेच्या माहितीसाठी व जनतेकडून सूचना मागविण्यासाठी प्रसिद्ध करण्यात आला होता. संविधानसभेने या मसुद्यावर 4 नोव्हेंबर 1947 पासून ते 26 नोव्हेंबर 1949 एवढा प्रदीर्घ काळ चर्चा केली. या चर्चेदरम्यान नागरिकांकडून आलेल्या 7635 पैकी 2473 सूचनाही सभेने विचारार्थ घेतल्या. अर्थातच संविधान निर्मितीत अनेक मान्यवरांचे महत्त्वपूर्ण योगदान लाभले आहे ज्यांचा उल्लेख स्वतः बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या शेवटच्या भाषणात केला आहे. या सर्व प्रक्रियेत मसुदा समितीचे अध्यक्ष या नात्याने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची भूमिका अतिशय महत्त्वाची राहिली. मसुदा समितीचे अन्य सदस्य आजारपण, परदेश वास्तव्य, मृत्यू अशा अनेक कारणांनी या कामात सहभाग देऊ शकले नाहीत. संविधानसभेत सदस्यांनी केलेल्या विविध सूचना कायदेशीर भाषेत आणि सर्वमान्य अशा पद्धतीने शब्दबद्ध करणे तसेच चर्चेतील मुद्यांबाबत इतर देशांच्या संविधानांमध्ये असलेल्या तरतुदी सदस्यांच्या माहितीसाठी प्रस्तुत करणे या जबाबदार्या बाबासाहेब पार पाडत होते. विविध सामाजिक घटकांचे आग्रही प्रतिनिधित्व करणारे संविधानसभेचे सदस्य आणि त्यांच्या परस्परविरोधी मतमतांतरातून सर्व भारतीयांना सन्मानाची हमी आणि विकासाची संधी देणारे संविधान सर्वसंमतीने बनविले यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि संविधानसभेचे सर्व सदस्य यांचे आपण ऋणी राहिले पाहिजे.

• •

# स्वातंत्र्यपूर्व काळातील राजकीय-सामाजिक चळवळी आणि भारतीय संविधान

भारतीय संविधान जरी संविधानसभेत प्रदीर्घ चर्चेअंती तयार झाले असले तरी या संविधानाची पायाभरणी ही स्वातंत्र्यपूर्व काळात झालेल्या राजकीय आणि सामाजिक चळवळीत झालेली आपल्याला दिसते. संविधानात कलम 17 हे अस्पृश्यता नष्ट करण्याबद्दलचे कलम आहे पण आपण हे निश्चित म्हणू शकतो की डॉ. बाबासाहेब आंबेडकर जेव्हा महाड येथे चवदार तळ्याचा सत्याग्रह करत होते आणि जनावरे जे पाणी पिऊ शकतात ते पाणी हाडामासाची असलेली अस्पृश्य माणसे का पिऊ शकत नाहीत असा सवाल उपस्थित करत होते तेव्हा अस्पृश्यताविरोधाचे कलम लिहिले जात होते. महात्मा फुले जेव्हा हंटर कमिशनसमोर निवेदन देऊन बहुजनांच्या शिक्षणाचा प्रश्न मांडत होते तेव्हा सक्तीच्या व मोफत शिक्षणाचे कलम 45 लिहिले जात होते. आपल्या संस्थानात जेव्हा शाहू महाराज बहुजनांना आरक्षणाची तरतूद करत होते किंवा डॉ. बाबासाहेब आंबेडकर जेव्हा दलित समाजाच्या न्याय्य हक्कांसाठी भांडत होते तेव्हा सामाजिक न्यायाची कलमेच लिहिली जात होती. तसेच शहीद भगतसिंग जेव्हा रौलट ॲक्टच्या विरोधात आवाज उठवत होते तेव्हा अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा मुद्दाच पुढे आणत होते. काँग्रेसच्या कराची अधिवेशनात (1931) जेव्हा मूलभूत अधिकारांचा ठराव मांडला जात होता तेव्हा भविष्यातील भारतीय संविधानातील मूलभूत अधिकाराचे प्रकरण आकार घेत होते. काँग्रेसच्याच 1936 च्या अधिवेशनात शेतीविषयक कार्यक्रम मांडला जात होता तो भविष्यातील स्वतंत्र भारत घडवताना धरावयाच्या आर्थिक समतेच्या आग्रहासाठीच असे आपण म्हणू शकतो. काँग्रेस आणि गांधी जेव्हा धार्मिक सलोखा व ऐक्याची भाषा वारंवार करत होते तेव्हा ते धर्मनिरपेक्षतेचाच आग्रह धरत होते. 1920 सालापासून भारतीय स्वातंत्र्यचळवळीत बहुसंख्य भारतीयांनी सहभाग नोंदविलेला दिसतो. ती चळवळ आपल्या प्रत्येक आंदोलनातून एका बाजूला स्वतंत्र भारताचे चित्र रेखाटत होती आणि दुसर्या बाजूला त्या चित्रात तुम्ही कुठे असाल हे भारतातील शेतकर्यांना, कामगारांना, आदिवासींना, दलितांना आणि महिलांना समजावून सांगत होती.यामुळेच 1920 पासून पुढे स्वातंत्र्यचळवळीत भारतीय लोक वाढत्या संख्येने सहभाग घेत राहिले. या सर्व बाबी म्हणजे स्वतंत्र

भारताच्या संविधानाची पायाभरणीच होती. स्वातंत्र्यपूर्व काळातील अशा अनेक राजकीय-सामाजिक चळवळी आपल्याला दिसतील ज्या भविष्यातील भारताबद्दल काही आग्रह धरत होत्या ज्याचा परिणाम संविधान बनत असताना झालेला आपल्याला दिसेल. या पुस्तकाच्या मर्यादेत त्या सर्वांची दखल घेणे अशक्य आहे.

• •

## भारतात संविधानाआधी काय होते?

ब्रिटिश भारतात आल्यावर भारतातले लोक स्वतःचा भारतीय म्हणून विचार करू लागले हे जसे काही प्रमाणात खरे आहे तसेच कायद्याचे राज्य ही संकल्पनासुद्धा त्याच काळात भारतात रुजू लागली हे ही खरे आहे. ब्रिटिशांच्या काळात ब्रिटिश इंडिया ॲक्ट नुसार भारताचा कारभार चालत होता. तो एका बाजूला सर्व भारतीयांना समान न्याय देत नव्हता आणि दुसर्या बाजूला ब्रिटिश आणि भारताचे नागरिक यांच्यात भेदभाव करणारा होता. भारताच्या आर्थिक शोषणास बळ देणारा होता. पण ब्रिटिशांच्या आधीच्या भारतात राजे-राजवाडे, संस्थानिक, वतनदार यांचे राज्य होते. या संस्थानिक-वतनदारांचा रयतेशी संबंध हा फक्त सारा किंवा कर वसूल करण्यापुरताच होता. महत्त्वाचे म्हणजे हे सर्व राजे-रजवाडे पुरोहितांच्या मान्यतेने कारभार हाकत असत. समाज जीवनावर पुरोहितशाहीतून आलेल्या धर्म संकल्पनांचा आणि परंपरांचा प्रभाव होता. या संकल्पना आणि परंपरा या माणसामाणसात आणि जातीजातीत आणि स्त्री-पुरुषात भेदभाव करणार्या होत्या. त्याकाळी धर्मग्रंथ मान्यताप्राप्त होते. हे धर्मग्रंथ विषमतेचा पुरस्कार करत होते. एकलव्याला जातीच्या आधारे शिक्षण नाकारले गेले. सावित्रीबाई फुले महिलांसाठी शाळा सुरू करत असताना त्याला तीव्र विरोध करणारी पुरोहितशाही ही धर्माचाच दाखला देत महिलांना शिकविणे हे

धर्मशास्त्रानुसार पाप आहे असे आग्रही आणि हिंसकपणे सांगत होती. एकाच गुन्ह्यासाठी खालच्या जातीतल्या मानल्या गेलेल्यांसाठी जास्त तीव्र शिक्षा आणि उच्च जातीतले मानले गेलेल्यांसाठी सौम्य शिक्षा हा त्याकाळचा न्याय होता. सरंजामदार आणि पुरोहित यांच्या संगनमताने सुरू असलेल्या त्या काळच्या कारभारात कुठेही व्यक्तिस्वातंत्र्य, कायद्यापुढे सर्व समान, सर्वांना समान संधी या मूल्यांची ओळखही नव्हती, अंमलबजावणीची बाब तर दूरच राहिली. या पार्श्वभूमीवर सर्व प्रौढ नागरिकांना मतदानाचा अधिकार देणारे, कायद्यापुढे सर्व समान मानणारे, जन्माच्या आधारे भेदभावास मनाई करणारे, संधीची समानता ही मूल्यव्यवस्था रुजवू पाहणारे, विषमता कमी करण्यासाठी राज्यव्यवस्थेवर जबाबदारी टाकणारे, संसाधनांच्या वाटपाबद्दल बहुसंख्याकांच्या हिताची भूमिका घेणारे आणि सर्वांना उपजीविकेचा अधिकार देणारे भारतीय संविधान आणि त्याचे महत्त्व आपण नीट समजून घेतले पाहिजे.

• •

# आम्ही भारताचे लोक

भारतीय संविधानाच्या प्रास्ताविकेची सुरुवात आम्ही भारताचे लोक अशी आहे. काय आहे याचा अर्थ. या संविधानातील जो काही संकल्प आहे तो आम्ही भारतीयांनी केलेला आहे, तो आमच्यावर कुणीही लादलेला नाही. उद्याचा भारत सार्वभौम, समाजवादी, धर्मनिरपेक्ष, लोकशाही गणराज्य म्हणून आम्हाला घडवायचा आहे. हे आमचे स्वप्न आहे. स्वातंत्र्यलढ्यात ज्यांनी लाठ्या खाल्ल्या, तुरुंगवास भोगला, प्राणाची आहुती दिली त्या स्वातंत्र्यवीरांनी बघितलेले हे स्वप्न आहे. त्या काळात ज्यांनी स्वातंत्र्यलढ्यात सहभाग घेतला नाही, ज्यांनी इंग्रजांची चाकरी करण्यात धन्यता मानली आणि आज जे विकासाचे खोटे मायाजाल उभे करत सत्तेत येऊन बसले आहेत त्यांना हे संविधान अडचणीचे असू शकते; पण ज्या शेतकर्यांनी, कामगारांनी, आदिवासींनी, महिलांनी आणि अनेक

कष्टकरी-बहुजनांनी स्वातंत्र्यलढ्यात सहभाग घेतला त्यांच्यासाठी हे संविधान त्यांच्या जगण्याचा आधार आहे.

आम्ही भारताचे लोक या या प्रकारचा भारत घडवण्याचा आणि भारतातील नागरिकांना या या प्रकारचे अधिकार देण्याचा संकल्प करून हे संविधान स्वतःप्रत अर्पण करत आहोत याचा आणखी एक अर्थ असा की भारतीय संविधानाने भारतीय नागरिकांना जे अधिकार बहाल केले आहेत ते अधिकार भारतीय नागरिकांना कुणा राजाने उदार होऊन दिलेले नाहीत किंवा परमेश्वराने कृपाळूपणाने बहाल केलेले नाहीत तर हे अधिकार म्हणजे आम्हा भारतीयांनीच एकमेकाच्या माणूसपणाला दिलेली मान्यता आहे. यातील क्रांतिकारी आशय नीट लक्षात घेऊन आपण भारतीयांनी एकमेकासोबत जगण्याची आणि विकासाच्या दिशेने एकसाथ पुढे पुढे जाण्याची सवय आपल्याला लावून घेतली पाहिजे.

• •

# संविधानाच्या प्रास्ताविकेचे महत्त्व

संविधानाचे प्रास्ताविक सार्वभौम भारताची भाषा करते. याचा अर्थ आता ब्रिटिश निघून जाणार आहेत. आमच्या भविष्याची जबाबदारी आमची आहे आणि त्यासाठीचे निर्णयही आम्ही लोकशाही पद्धतीने घेणार आहोत. आमच्या निर्णयप्रक्रियेवर बाहेरून कोणाचाही दबाव असणार नाही. निर्णय घेताना भारतीय जनता सार्वभौम असणार आहे. पण संविधानात असे लिहिलेले असले तरी मुक्त (मोकाट?) अर्थकारणाच्या आग्रहातून, संसदेला-जनतेला विश्वासात न घेता जागतिक व्यापार करारावरती भारत सरकारने सह्या केल्यावर भारताची विकासप्रक्रिया खरेच सार्वभौम राहिली आहे का हा जसा प्रश्न पडतो तसाच नीरा राडिया टेप प्रकरणातील खुलाशानुसार केंद्रीय मंत्री नेमताना सुद्धा उद्योगपती आपल्याला हव्या त्या पद्धतीने यशस्वी हस्तक्षेप करताना दिसतात त्यावरून सरकारची निर्णयप्रक्रिया खरेच लोकांच्या गरजा व आकांक्षांच्या पूर्ततेसाठी

प्रतिसाद देते की निवडणुकीसाठी पक्षाला निधी पुरविणार्या उद्योगपतींच्या नफेखोरीसाठी कार्यरत राहते हाही प्रश्न पडतो. संविधानात समाजवादी, धर्मनिरपेक्ष, लोकशाही गणराज्य घडविण्याचा संकल्प आहे याचा अर्थ काय याबद्दल आपण या पुस्तिकेत नंतर सविस्तर चर्चा करूच पण काही लोक सतत हा आक्षेप घेतात की मूळ संविधानाच्या प्रास्ताविकेत समाजवाद व धर्मनिरपेक्षता हे शब्द नव्हते. त्यांचा असाही आक्षेप असतो की इंदिरा गांधींनी हे शब्द संविधानात घुसडले. पहिला मुद्दा म्हणजे हे शब्द घुसडले नाहीत तर रीतसर कायदेशीरपणे घटनादुरुस्तीची प्रक्रिया राबवून 42 व्या घटनादुरुस्तीद्वारे हे शब्द प्रास्ताविकेत आले आहेत. सर्वोच्च न्यायालयाच्या दृष्टीने 42 व्या घटनादुरुस्तीतील त्यांना अयोग्य वाटणारे काही मुद्दे नंतर सर्वोच्च न्यायालयाने रद्दबातल केले. नंतर आलेल्या जनता पक्षाच्या सरकारनेही पुन्हा घटना दुरुस्ती करून 42 व्या घटनादुरुस्तीद्वारे झालेले काही बदल फिरविले. पंतप्रधानांवरील आरोपांच्या चौकशीबाबत पंतप्रधानांना अनावश्यक संरक्षण देणारे मुद्दे, जे इंदिरा गांधींनी स्वतःला वाचविण्यासाठी मंजूर करून घेतले होते अशा काही दुरुस्त्या जनता सरकारने निरस्त केल्या; पण या दोन्ही वेळी सर्वोच्च न्यायालय अथवा संसदेने प्रास्ताविकेतील समाजवाद व धर्मनिरपेक्षता हे शब्द तसेच राहू दिले आहेत हे विशेष. दुसरा मुद्दा म्हणजे मूळ संविधानाच्या प्रास्ताविकेत जरी हे दोन शब्द नसले तरी संविधानातील अनेक कलमे ही समाजवाद व धर्मनिरपेक्षता हा आशय सांगणारी आहेतच. म्हणजे जे संविधानाच्या आतल्या पानावर होतेच ते संविधानाच्या पहिल्या पानावर आणले इतकेच.

अलीकडे एनडीए चे सरकार पाठ्यपुस्तकात धर्मनिरपेक्षता या शब्दाऐवजी पंथनिरपेक्षता हा शब्द वापरत आहे. मूळ इंग्रजी शब्द सेक्युलॅरिजमचे भाषांतर म्हणून पंथनिरपेक्षता हा शब्द वापरावा का हा प्रश्न आहे. धर्मनिरपेक्षता शब्द म्हणजे धर्माचा विचार न करता, म्हणजेच हिंदू, मुस्लीम, ख्रिश्चन, बौद्ध, पारसी असा कुठलाही विचार न करता सरकारने निर्णय करावेत. पंथनिरपेक्षता म्हणताना आताच्या राज्यकर्त्यांना हा वरील अर्थच अभिप्रेत आहे का हे स्पष्ट

होत नाही. आत्ताच्या सत्ताधार्यांच्या मते पंथनिरपेक्षता म्हणजे हिंदू धर्मातील वेगवेगळे पंथ जसे जैन, शीख, लिंगायत आणि अन्य यांच्याबाबत निरपेक्ष पद्धतीने विचार करावा असे आहे का? हे कळले पाहिजे. म्हणजे पंथनिरपेक्ष हे भाषांतर वापरून सध्याचे सत्ताधारी सेक्युलॅरिजमच्या चर्चाविश्वातून मुस्लीम आणि ख्रिश्चन यांना वगळू पाहत आहेत की काय अशी शंका घ्यायला जागा आहे. तसे असेल तर हे संविधानातील आशयाला धरून नाही हे स्पष्टपणे सांगितले पाहिजे.

भारतीय संविधानाचे प्रास्ताविक ‘ संधीची समानता’  हा महत्त्वपूर्ण शब्द वापरते. संविधानाने भारतीयांना केवळ जगण्याची हमी दिलेली नाही तर सन्मानाने जगण्याची हमी दिलेली आहे आणि ही हमी वास्तवात यायची असेल तर संधीची समानता प्रत्यक्षात उतरविणे आवश्यक आहे. भारतीय समाजातील वाढता गरीब-श्रीमंत भेद, जन्माच्या आधारे उच्च-नीचता ठरविणारा जातिभेद आणि महिलांच्याकडे पाहण्याचा पुरुषी दृष्टिकोन पाहता संधीची समानता हे आश्वासन वास्तवात आणण्यासाठी शासनाने आणि समाजानेही म्हणजेच आपण सर्वांनी बरेच काही करणे आवश्यक आहे.

संविधानाचे प्रास्ताविक स्वातंत्र्य, समता आणि बंधुतेची भाषा करते. या तीनही बाबींचा सुटासुटा विचार करता येत नाही. आपण जर फक्त स्वातंत्र्याची भाषा करू लागलो तर ते स्वातंत्र्य सर्वांना सहजपणे उपभोगता येणार नाही. स्टँडवर जर गर्दी असेल आणि फलाटाला लागत असलेल्या बसमध्ये बसण्याचे सर्वांना स्वातंत्र्य आहे, एवढेच जर जाहीर केले तर बलदंड पुरुषच त्या बसमध्ये जागा पकडतील आणि लहान मुले, महिला, अपंग पुरुष यांना बसमध्ये चढताच येणार नाही. त्याचप्रमाणे समाजात फक्त स्वातंत्र्य आहे असे मानल्यास समाजातील जातदांडगे आणि धनदांडगेच सर्व फायदे उपटतील, पुरुष फायदे उपटतील. मात्र जातव्यवस्थेने अन्याय केलेले समूह आणि पुरुषसत्ताक पद्धतीच्या बळी असलेल्या स्त्रिया तसेच आर्थिक दुर्बल घटकातील नागरिक हे

कायम मागेच राहतील. हे टाळायचे असेल तर समतेची भाषा आणि संधीच्या समानतेची हमी आवश्यक असते. नुसती समतेची भाषाही पुरेशी नाही कारण स्वातंत्र्य नसेल तर वैयक्तिक कर्तुत्वशक्ती मारली जाऊ शकते. आणि केवळ कायदेशीर तरतुदींनी स्वातंत्र्य आणि समता आणण्याचा प्रयत्न हा तांत्रिक, कोरडा आणि वरवरचा ठरू शकतो, त्यासाठी बंधुता आवश्यक असते. बंधुतेच्या साहाय्याने येऊ शकणारी समता ही नैसर्गिक आणि खोलवरची असू शकते. संविधान सभेतील आपल्या शेवटच्या भाषणात बाबासाहेबांनी या मुद्याबाबत फार महत्त्वाचे भाष्य केलेले दिसते.

• •

# संविधान दुरुस्तीच्या कलमाचा अर्थ

संविधानात 368 वे कलम हे घटनादुरुस्तीचे कलम आहे. योग्य ती प्रक्रिया पार पाडून आणि संविधानाच्या मूलभूत गाभ्यात कुठलाही बदल न करण्याचे बंधन पाळून संविधानात आवश्यक ते बदल करण्याची तरतूद या कलमात आहे. घटनादुरुस्तीचा संसदेचा अधिकार आणि संविधानातील नागरिकांचे मूलभूत अधिकार याबाबत सर्वोच्च न्यायालय आणि संसद यांच्यात झालेला प्रदीर्घ वाद-संवाद तपशिलात अभ्यासण्याचा विषय आहे. नागरिकांना संपत्तीचा अधिकार हा मूलभूत अधिकार म्हणून देणार्या कलमावरून हा वाद-संवाद झालेला आहे. पुढे घटनादुरुस्तीद्वारे हे कलम संविधानातून वगळले आहे. आजवर झालेल्या घटनादुरुस्त्या व त्या होण्यामागची पार्श्वभूमी हा सुद्धा स्वतंत्र अभ्यासाचा विषय आहे. या पुस्तकाच्या मर्यादेत तो देणे अशक्य आहे.

संविधानाआधी समाजावर धर्मग्रंथ आणि धर्माधिष्ठित व्यवस्थेचा प्रभाव होता हे आपण पाहिले. धर्मग्रंथांबाबत त्या त्या धर्मातील कट्टरतावाद्यांचे काय म्हणणे असते. धर्मग्रंथ हे अपौरुषेय आहेत किंवा धर्मग्रंथ हे थेट परमेश्वराने सांगितलेले असल्याने ते अपरिवर्तनीय आहेत. त्यामुळे जोवर मानवी जीवन आहे तोवर या धर्मग्रंथात कुठलाही बदल संभवत नाही, अशीच धारणा सर्वच धर्मातील कट्टरपंथियांची असते. त्या पार्श्वभूमीवर संविधान दुरुस्तीच्या कलमाचे महत्त्व आपण समजून घेतले पाहिजे.

या कलमाच्या संदर्भात बाबासाहेबांची भूमिका महत्त्वाचे भाष्य करते. ज्याप्रमाणे आम्ही आमच्या भविष्याचा निर्णय इंग्रजांवरती सोपवायला तयार नाहीत त्याचप्रमाणे आमच्याच पुढच्या पिढ्यांच्या भविष्याचे निर्णय घेण्याबाबतच्या त्यांच्या अधिकारावरतीही आम्ही अतिक्रमण करू इच्छित नाही अशी त्यांची भूमिका दिसते. लोकशाही तत्त्व आणि व्यवहाराशी बाबासाहेबांची जी घट्ट बांधीलकी होती ती लक्षात घेता हे वाक्य योग्यच आहे. संविधानातील मूल्यांना ज्यांचा विरोध आहे अशा शक्ती आज मोठ्या प्रमाणावर कार्यरत असताना संविधानाच्या मूलभूत चौकटीत बदल होणार नाहीत यासाठी संविधानाबद्दल आस्था असणारांनी सावध आणि सक्रिय राहण्याची गरज आहे.
• •

# संविधानाने भारतीयांना दिलेले मूलभूत अधिकार

संविधानाच्या भाग तीनमध्ये कलम 12 ते कलम 35 मध्ये मूलभूत अधिकारांचा तपशील दिलेला आहे.

* कायद्यापुढे समानता (कलम 14),

* धर्म, वंश, जात, लिंग किंवा जन्मस्थान या कारणावरून नागरिकांमध्ये भेदभाव करण्यास मनाई, मात्र भारतातील सामाजिक, आर्थिक विषमता लक्षात घेऊन महिला, बालके, सामाजिक-शैक्षणिकदृष्टया मागासवर्ग (ओ.बी.सी.), अनुसूचित जाती (एस.सी.) आणि जनजाती (एस.टी.) यांच्या कल्याणासाठी विशेष तरतूद करण्यास या कलमाचा प्रतिबंध असणार नाही (कलम 15).

* सार्वजनिक सेवायोजनांच्या (सरकारी नोकर्या) बाबींमध्ये सर्व नागरिकांस समान संधी, मात्र मागासवर्गीय, अनुसूचित जाती आणि जनजातींना राज्याच्या नियंत्रणाखालील सेवांमध्ये पर्याप्त प्रतिनिधित्व मिळालेले नसल्यास त्यांच्यासाठी पदे राखून ठेवण्याची अथवा आरक्षणाची तरतूद करण्यास राज्यास प्रतिबंध होणार नाही (कलम 16)

* अस्पृश्यता नष्ट करणे (कलम 17)

* भाषण व अभिव्यक्ती स्वातंत्र्य (कलम 19)

* अपराधाबद्दलच्या दोषसिद्धीबाबत संरक्षण (कलम 20)

* जीवित व व्यक्तिगत स्वातंत्र्य यांचे संरक्षण (कलम 21)

* शिक्षणाचा हक्क (कलम 21 क)

* विवक्षित प्रकरणी अटक व स्थानबद्धता यापासून संरक्षण (कलम 22)

* माणसांचा अपव्यापार आणि वेठबिगारी यांना मनाई (कलम 23)

* कारखाने इत्यादीमध्ये बालकांना कामास ठेवण्यास मनाई (कलम 24)

* सद्सद्विवेकबुद्धीचे स्वातंत्र्य आणि धर्माचे मुक्त प्रकटीकरण, आचरण व प्रसाराचे स्वातंत्र्य (कलम 25)

* अल्पसंख्यांक वर्गाच्या हितसंबंधांचे संरक्षण (कलम 29)

* संपदांचे संपादन इत्यादींकरिता तरतूद (कलम 31 क)

असे काही महत्त्वाचे मूलभूत अधिकार संविधानाने नागरिकांना दिले आहेत. मूलभूत अधिकार हे माणसाचे निसर्गदत्त असे आणि जे त्याला जन्मतःच उपलब्ध असले पाहिजेत असे अधिकार मानले जातात. मूलभूत अधिकारांचे हनन होत असेल किंवा त्यापासून आपल्याला वंचित ठेवले जात असेल तर नागरिक न्यायालयात जाऊन दाद मागू शकतात. म्हणजेच मूलभूत अधिकार हे न्यायालयाकडून अंमलबजावणीयोग्य असे असतात. (Enforceable by court) संविधानाने आपल्या सर्वांना अभिव्यक्ती स्वातंत्र्य, संचार स्वातंत्र्य, व्यवसाय स्वातंत्र्य दिले आहे. सन्मानाने जगण्याचा अधिकार दिला आहे. संविधान आपल्या सर्वांसाठी आहे हे जास्त महत्त्वाचे आहे.

संविधानाचे मूळ कलम 31 हे नागरिकांना मालमत्तेचा अधिकार देणारे कलम होते; पण नंतर घटनादुरुस्तीद्वारे हे कलम वगळले गेले आहे.

(या ठिकाणी फक्त त्या त्या कलमाची शीर्षके दिलेली आहेत. संबंधित कलमांचा अर्थ नीट समजण्यासाठी संविधानात दिलेली त्या त्या कलमाची संपूर्ण शब्दरचना वाचणे आवश्यक आहे)

- •

# राज्य धोरणांची निदेशक तत्त्वे

(Directive principles of state policy)

संविधानाच्या भाग चार मध्ये कलम 36 ते 51 मध्ये राज्य धोरणाची निदेशक तत्त्वे दिलेली आहेत. या भागाच्या सुरुवातीस संविधान निर्मात्यांनी आवर्जून असे म्हटले आहे की या भागात अंतर्भूत असलेल्या तरतुदी कोणत्याही न्यायालयाकडून अंमलबजावणीयोग्य असणार नाहीत; पण तरीसुद्‌धा त्यात घालून दिलेली तत्त्वे देशाच्या शासन व्यवहाराच्या दृष्टीने मूलभूत आहेत आणि कायदे करताना ही तत्त्वे लागू करणे हे राज्याचे कर्तव्य असेल. म्हणजेच जरी राज्य धोरणांच्या निदेशक तत्त्वांच्या अंमलबजावणीसाठी नागरिकांना न्यायालयात दाद मागता येत नसली तरी त्याचे महत्त्व अधोरेखित करण्याचा आणि राज्यव्यवस्थेने ही तत्त्वे गंभीरपणे घ्यावीत असे ठसविण्याचा प्रयत्न संविधान निर्मात्यांनी केलेला आहे. आपण थोडक्यात ती कलमे पाहूया.

* राज्याने लोककल्याणाच्या संवर्धनासाठी समाजव्यवस्था प्रस्थापित करणे (कलम 38)

* राज्य शक्य होईल तितक्या परिणामकारकरितीने सामाजिक, आर्थिक व राजकीय न्यायाची अंमलबजावणी करेल व राष्ट्रजीवनाच्या सर्व घटकांना सामावून घेणारी समाजव्यवस्था प्रस्थापित करेल.लोककल्याणासाठी राज्य सतत प्रयत्नशील राहील. (कलम38(1))

* राज्य हे व्यक्ती-व्यक्तींमधील आणि निरनिराळ्या क्षेत्रात राहणार्या लोकांमधील तसेच वेगवेगळ्या व्यावसायिकांमधील उत्पन्नाच्या बाबतीतील विषमता कमी करण्यासाठी अटोकाट प्रयत्न करील. दर्जा, सुविधा व संधी यांच्या बाबतीत असलेली विषमता नाहीशी करण्यासाठी राज्य प्रयत्नशील राहील. कलम 38(2)

* स्त्री व पुरुष नागरिकांना उपजीविकेचे साधन मिळविण्याचा हक्क राहील. कलम39(क)

* सामूहिक हिताला सर्वाधिक उपकारक होईल अशा रितीने समाजाच्या भौतिक साधनसंपत्तीचे स्वामित्व व नियंत्रण यांची विभागणी व्हावी. कलम39(ख)

* आर्थिक यंत्रणा राबविण्याच्या परिणामी संपत्ती व उत्पादन साधनांचा संचय सामूहिक हितास बाधक अशा रितीने एकाच ठिकाणी होऊ नये. कलम39(ग)

* पुरुष व स्त्रिया या दोघांनाही समान कामासाठी समान वेतन मिळावे. कलम39(घ)

* स्त्री व पुरुष कामगारांचे आरोग्य व ताकद आणि बालकांचे कोवळे वय यांचा दुरुपयोग करून घेतला जाऊ नये. कुणालाही आर्थिक गरजेपोटी त्यांचे वय व ताकद यास न पेलवणारा व्यवसाय करावा लागू नये. कलम39(ङ)

* बालकांना मुक्त व प्रतिष्ठापूर्ण वातावरणात विकासाची संधी व सुविधा मिळावी. त्यांना शोषणापासून तसेच नैतिक-भौतिक गरजांच्या बाबतीत उपेक्षेपासून संरक्षण मिळावे. कलम39(च)

* समान संधीच्या तत्त्वावर न्यायाची अभिवृद्धी व्हावी आणि आर्थिक व अन्य अडचणीमुळे कुणालाही न्याय नाकारला जाणार नाही याची खात्री असावी. कलम 39 (क)

* कामाचा, शिक्षणाचा व विवक्षित बाबतीत साहाय्याचा हक्क नागरिकांना असेल. (राज्याच्या आर्थिक क्षमता व विकासाच्या मर्यादेत). (कलम41)

• •

# समाजवाद यापेक्षा वेगळा काय असू शकतो?

मागील प्रकरणात दिलेली कलमे जर आपण नीट समजून घेतली तर आपल्या असे लक्षात येईल की संविधानाने राज्यावर * सर्व प्रकारच्या विषमता कमी करण्याची * राष्ट्रजीवनाच्या सर्व घटकांना विकासप्रक्रियेत सामावून घेण्याची * लोककल्याणाची * उपजीविकेचे साधन सर्वांना मिळवून देण्याची * भौतिक साधनांचे स्वामित्व व नियंत्रण हे सामूहिक हितासाठीच करण्याची * संपत्ती व उत्पादन साधनांचे केंद्रीकरण होणार नाही अशी आर्थिक धोरणे राबविण्याची * स्त्रिया आणि बालके यांचे शोषण थांबविण्याची * कायदेविषयक मोफत साहाय्याची * आपल्या मर्यादेत कामाचा-शिक्षणाचा आणि लोकसहाय्याचा म्हणजेच सरकारकडून साहाय्याचा हक्क नागरिकांना देण्याची जबाबदारी टाकली आहे. समाजवाद यापेक्षा वेगळा काय असू शकतो? म्हणूनच आधी म्हटल्याप्रमाणे संविधानातील विविध कलमात समाजवादी आशय आधीपासून होताच त्यामुळे 42 व्या घटनादुरुस्तीद्वारे तो प्रास्ताविकेत घुसडला हा आक्षेप योग्य नाही.

पण या सर्व कलमांच्या पार्श्वभूमीवर आजची परिस्थिती जर आपण पाहिली तर सहजपणे लक्षात येईल की वेगवेगळे पक्ष आणि आघाड्यांच्या सरकारांनी ही कलमे प्रभावीपणे राबविण्याचा विचार गंभीरपणे घेतला नाहीच पण बहुतेक वेळा या कलमांच्या विरोधी, संविधानातील तरतुदींच्या विरोधी कारभार सरकारांनी केलेला दिसतो. आज

* आत्महत्याग्रस्त शेतकरी समाज

* महिला अत्याचारांच्या वाढत्या घटनांच्या पार्श्वभूमीवर वाढत्या असुरक्षित वातावरणात सार्वजनिक जीवनातून मागे मागे सरकणारा महिलावर्ग

* राबराब राबून देशाच्या संपत्तीत भर घालणारा आणि तरीही रोजगाराची हमी, किमान वेतन आणि सामाजिक सुरक्षेसाठी आक्रोश करणारा असुरक्षित/असंघटित कष्टकरी समाज

* शिक्षण, नोकर्या, बँकांकडून कर्ज, सरकारी योजनांचे लाभार्थी आणि लोकप्रतिनिधींची सभागृहे अशा सर्व ठिकाणी ज्याचा टक्का अतिशय अल्प आहे पण केवळ संशयावरून पोलीस कोठडीत डांबलेल्या तरुणांच्या बाबतीत जो समाज सर्वांत आघाडीवर आहे असा संशय व अविश्वासाच्या वातावरणात जगणारा मुस्लीम समाज

* जल-जंगल-जमिनीवरचा आपला अधिकार मागतो किंवा बहुराष्ट्रीय कंपन्यांना कवडीमोलाने खनिजसंपत्ती बहाल करण्यास विरोध करतो म्हणून ज्याला नक्षलवादी ठरविले जाते असा आदिवासी समाज

* जन्माच्या आधारे ठरत असलेल्या उच्च-निचतेचे चटके सहन करणारा दलित समाज

* स्वातंत्र्याच्या 69 वर्षांनंतरही परिघावरच जगणारे भटके विमुक्त समूह

* शेतमजूर, बांधकाम मजूर मच्छिमार, खाणकामगार, घरेलू कामगार, पथारी व्यावसायिक, रिक्षा चालक

अशा सगळ्या समूहांना विकासप्रक्रियेत सामावून घेण्यासाठी कुठल्याही सरकारने खरेच काही केले आहे का? या सर्वच समूहांमध्ये आज जे नैराश्य आणि हताशा आहे याला जबाबदार कोण? संविधानाच्या वरील तरतुदी या समूहांपर्यंत पोहोचल्याच नाहीत याचे काय करायचे? विषमता कमी करण्याची जबाबदारी राज्यावर असताना ती वाढतेच आहे आणि अधिक बटबटीतपणे अंगावर येत आहे. एकेकाळी शेतकर्यांना सिलिंगचा कायदा लावून त्यांच्याकडच्या अतिरिक्त जमिनी राज्याने काढून घेतल्या पण आज ‘ एसईझेड’ च्या नावाने हजारो एकर जमिनी उद्योगपतींच्या घशात घालण्यासाठी सरकारच दलाली करत असताना किंवा शेतकर्यांच्या कर्जमाफीला ठाम नकार देणारे सरकार राष्ट्रीयीकृत बँकांचे लाखो कोटी रुपयांचे कर्ज थकविणार्या उद्योगपतींकडून ते वसूल करण्यासाठी ठोस भूमिका घेताना दिसत नाही. किंबहुना कर्जबुडव्या उद्योगपतींकडून ते वसूल करा म्हणणार्या रिझर्व बँकेच्या गवर्नरलाच घरी पाठविण्याचा निर्णय सरकार घेते. अशा सर्व घटनांत संविधानातील 39(ख), 39(ग) कलमांच्या विरोधात सरकारचा व्यवहार असतो हे नागरिकांनी लक्षात घेतले पाहिजे.

मूठभरांच्या विकासासाठी आणि विशेषतः निवडणूक काळात निधी पुरविणार्यांसाठी सर्व कायदे, नियम एवढेच नव्हे तर संविधानसुद्धा धाब्यावर बसविले जात असताना

कष्ट करून, घाम गाळून देशाच्या संपत्तीत भर घालणार्या वर्गास वार्यावर सोडून देण्याची अनेक उदाहरणे तुम्हालाही सापडतील, पण प्रश्न असा आहे की आपण काय करणार? सरकारला धोरणांचा फेरविचार करायला लावण्यासाठी आणि संविधानातील वरील सर्व तरतुदींशी प्रामाणिक राहण्याची भूमिका घ्यायला लावण्यासाठी संवैधानिक मार्गाने काय आणि कसे करायचे?

डॉ. रावसाहेब कसबे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि भारतीय संविधान या पुस्तकात लिहिल्याप्रमाणे आर्थिक समतेसाठीचा वरील कार्यक्रम मूलभूत अधिकारांचा भाग बनावा असा बाबासाहेबांचा प्रयत्न होता पण त्याला संविधानसभेत पुरेसे समर्थन मिळू शकले नाही म्हणून मग बाबासाहेबांनी हा कार्यक्रम राज्य धोरणांच्या निदेशक तत्त्वांचा भाग बनविला. त्यावेळी काहीजणांची भूमिका अशी होती की देश नुकताच स्वतंत्र होत आहे, फाळणीच्या जखमा बर्या करण्याचा प्रयत्न करतो आहे, इंग्रजांनी अनेक वर्ष आर्थिक शोषण केल्याने सरकारच्या आर्थिक मर्यादा आहेत, त्यामुळे एवढी मोठी जबाबदारी आजच सरकारवर टाकली तर उद्या उठून नागरिक कोर्टात जातील व गरीब सरकारची कोंडी करतील त्यामुळे आर्थिक समतेच्या या कार्यक्रमास मूलभूत अधिकारांचा भाग बनवू नये. बरे मग आज ही परिस्थिती बदलली आहे की नाही? माझ्या माहितीप्रमाणे संविधान लागू झाल्यानंतरचा भारताचा पहिला अर्थसंकल्प म्हणजे 1950-51 सालचा अर्थसंकल्प तत्कालीन वित्तमंत्री जॉन मथाई यांनी 28 फेब्रुवारी 1950 ला सादर केला, तो 347.5 कोटी रुपयांचा होता. आणि यावर्षी वित्तमंत्री अरुण जेटली यांनी सादर केलेला सन 2016-2017 चा अर्थसंकल्प आहे 19.78 लाख कोटी रुपयांचा. म्हणजेच भारत देशाची संपत्ती साधारण साडेतीनशे कोटी रुपयावरून आज जवळपास वीस लाख कोटी रुपयांपर्यंत वाढली आहे. यातील चलनफुगवट्यामुळे झालेली वाढ वजा जरी केली तरी आज देश श्रीमंत झाला आहे हे नक्की. ही जी देशाची श्रीमंती वाढली त्यात शेतकर्यांच्या आणि कष्टकर्यांच्या घामाचा हिस्सा निर्विवादपणे मोठा आहे; पण तो त्यांना अजिबात मिळालेला नाही. तो हिस्सा त्यांना मिळायचा तर किमान दोन गोष्टींची जबाबदारी सरकारने आज घ्यायला हवी. ती म्हणजे शिक्षण आणि रोजगाराच्या अधिकाराची. सर्वांना प्राथमिक ते उच्च शिक्षणापर्यंतचे सर्व शिक्षण हे चांगल्या प्रतीचे व मोफत मिळावे आणि सर्वांना सक्षम रोजगार पुरविण्याची जबाबदारी मूलभूत अधिकार म्हणून सरकारने स्वीकारण्याची वेळ

आता आली आहे. संविधानातील तरतुदींना न्याय द्यायचा असेल तर किमान एवढे तरी सरकारने केलेच पाहिजे.

आणखी काही महत्त्वाची राज्य धोरणांची निदेशक तत्वे

* ग्रामपंचायतींचे संघटन (कलम 40)

* कामाबाबत न्याय्य व मानवीय परिस्थिती आणि प्रसूतीविषयक साहाय्याची तरतूद (कलम 42)

* कामगारांना निर्वाहवेतन इत्यादी (कलम 43)

* उद्योगधंद्यांच्या व्यवस्थापनात कामगारांचा सहभाग (कलम 43क)

* सहकारी संस्थांचे प्रवर्तन (43ख)

* नागरिकांकरिता एकरूप नागरी संहिता (कलम 44)

* सहा वर्षापेक्षा कमी वयाच्या बालकांची बाल्यावस्थेतील देखभाल आणि शिक्षणाकरिता तरतूद (कलम 45)

* अनुसूचित जाती, अनुसूचित जनजाती आणि इतर दुर्बल घटक यांचे शैक्षणिक व आर्थिक हितसंवर्धन (कलम 46)

* पोषणमान व राहणीमान उंचावणे आणि सार्वजनिक आरोग्य सुधारणे हे राज्याचे कर्तव्य (कलम 47)

* कृषी व पशुसंवर्धन यांची सुसूत्र व्यवस्था लावणे (कलम 48)

वरीलपैकी बहुतेक कलमांचे महत्त्व सहज समजण्याजोगे आहे पण यातील दोन कलमांची चर्चा या पुस्तकात आवश्यक आहे असे वाटते.

• •

# एकरूप नागरी संहिता (समान नागरी कायदा)

संविधानातील या 44 व्या कलमासंदर्भात सर्वोच्च न्यायालयानेही अनेकदा सरकारकडे विचारणा केली आहे. एकरूप नागरी संहिता करण्यासंदर्भात सरकारचा काय विचार आहे अशी चौकशी करून या विषयाबाबत आपला आग्रह नोंदविला आहे. भारतीय जनता पक्षाच्या जाहीरनाम्यात प्रत्येक वेळी समान नागरी कायदा या नावाने हा विषय समाविष्ट असतो. काही हिंदू कट्टरतावादी गट सतत मुस्लीम समाजाचा तथाकथित अनुनय आणि या विषयाची सांगड घालत धार्मिक सलोखा बिघडविण्याचा प्रयत्न करत असतात. समान नागरी कायद्याची मागणी करणार्यांनी समान नागरिकत्वाबाबतही मनात स्पष्टता ठेवली पाहिजे. समान नागरी कायदा नसल्याने राष्ट्रीय एकात्मतेला फार मोठा धोका आहे अशीही काहींची मांडणी असते. या विषयाशी संबंध असलेल्या सर्वच समाजघटकांनी व्यापक समाजहित डोळ्यासमोर ठेवून या मुद्याचा खुलेपणाने विचार केला पाहिजे. पहिली बाब म्हणजे नागरिकांचे आपापसातील संबंध व व्यवहार नियमित करण्यासाठीचे जे जे कायदे आहेत त्यापैकी 99 टक्के कायदे सर्व धर्मियांसाठी समान आहेतच. वाहतुकीचा सिग्नल जर तोडला किंवा चोरी केली, भ्रष्टाचार केला किंवा कोणाला जमीन खरेदी-विक्री करायची असेल किंवा उत्पन्नावर कोणी किती आयकर भरावा अशा कितीतरी बाबतीत जे कायदे आहेत ते वेगवेगळ्या धर्मातील लोकांसाठी वेगवेगळे नसून सर्वांसाठी सारखेच आहेत. वेगवेगळ्या धर्मियांसाठी वेगवेगळे कायदे हे फक्त विवाहपद्धती, घटस्फोटाची व पोटगीची नियमावली, वारसा आणि दत्तक या चारच मुद्यांच्याबाबतीत आहेत. आता या चार मुद्यांच्याबाबतीत एकरूप नागरी संहिता बनवायची तर त्याचा अर्थ एका धर्माच्या पद्धती, नियम दुसर्या धर्मावर लादणे असा तर नक्कीच होऊ शकत नाही. या मुद्यांबाबत फक्त मुस्लीम समाजाची अडचण नाही. हिंदूमधील वेगवेगळ्या जाती जमातीतही लग्नाबाबत वेगवेगळ्या परंपरा आहेत. बर्याच ठिकाणी घटस्फोटाबाबतचे निर्णय जातपंचायतीच करतात आणि तिथे बहुतेक वेळा महिलांवर अन्याय होतोच होतो.

वरील चार मुद्यांच्याबाबत एकरूप नागरी संहिता बनवायची तर धर्माच्या अभ्यासकांसोबत कायदेतज्ज्ञ, शरीरविज्ञानाचे तज्ज्ञ, सामाजिक शास्त्राचे अभ्यासक अशा लोकांना बसवून चारही बाबतीत कुठल्या धर्मात चांगल्या परंपरा आहेत त्या तपासून प्रत्येक धर्मातील काही योग्य असलेले घ्यावे लागेल आणि त्या धर्मातील अयोग्य असलेले नाकारावे लागेल. ही प्रक्रिया खूपच किचकट असणार आहे पण मनमोकळ्या संवादातून हळूहळू ती पुढे नेता येते का हे बघावे लागेल. महिलांवर अन्याय करणार्या किंवा महिलांची अप्रतिष्ठा करणार्या परंपरा कुठल्याही धर्मात असतील तर त्या नाकाराव्या लागतील. उदाहरणार्थ जुबानी तलाक, बहुपत्नीत्व, विवाहप्रसंगी कन्यादान अशा परंपरा नाकाराव्या लागतील. महिलांना आणि त्यातही विशेषतः मुस्लीम महिलांना न्याय देण्यासाठी काही पावले आपण उचलली पाहिजेत. हा संवाद समाजात सुरू व्हायचा असेल तर या विषयाच्याबाबत राष्ट्रीय एकात्मतेला धोका, कुणाचे तरी लांगूलचालन ही ओरड थांबविली पाहिजे. कुठलाही मसुदा अथवा प्रस्ताव न देता समान नागरी कायदा हा केवळ जाहीरनाम्यात जिवंत ठेवण्यापुरता आणि अधूनमधून अल्पसंख्यांकावर दोषारोप करण्याकरिता वापरावयाचा मुद्दा असू नये. एकरूप नागरी संहितेच्या दिशेने वाटचाल म्हणून दोन गोष्टीवर आपण काम करू शकतो. एक म्हणजे त्या त्या धर्मासाठी जे वैयक्तिक कायदे (पर्सनल लॉज) आहेत त्यात महिलांना न्याय देण्याच्या दृष्टिकोनातून योग्य त्या सुधारणा घडवून आणण्याचा प्रयत्न करणे आणि दुसरे म्हणजे विशेष विवाह कायद्यानुसार सर्वांनी लग्न करण्याचा आग्रह धरणे. विशेष विवाह कायदा सर्व जाती-धर्माच्या लोकांना लागू होतो, तो कायदा सर्वांसाठी समान आहे,म्हणजेच खर्या अर्थाने जो कायदा धर्मनिरपेक्ष कायदा आहे त्या कायद्याप्रमाणे विवाह करण्याचा सर्व धर्मीयांनी आग्रह धरावा. याच पद्धतीने मूल दत्तक घेण्याच्या बाबत सर्वोच्च न्यायालयाचा एक चांगला निकाल आलेला आहे. सर्व धर्मियांनी त्याप्रमाणे वागावे. त्यातून जो संवाद वाढेल तो आपल्याला हळूहळू एकरूप नागरी संहितेकडे घेऊन जाईल.

• •

# गोवंशहत्या बंदी

आजच्या भारतात उलटसुलट चर्चेने हा मुद्दा प्रसिद्धीत आला आहे. दुर्दैवाने आपल्या देशात प्रत्येक मुद्याला धार्मिक विद्वेषाच्या अंगाने वाढवत मतांच्या राजकारणाची पोळी भाजण्याची प्रवृत्ती सतत कार्यरत राहते. संविधानाच्या 48 व्या कलमात या मुद्द्याचा जो उल्लेख आहे तो आधुनिक व शास्त्रीय रितीने कृषी व पशुसंवर्धनाची सुसूत्र व्यवस्था लावण्याबाबत आहे. या कलमात शेवटी जो उल्लेख आहे तो असा आहे, गाई व वासरे आणि दुभती व जुंपणीची गुरे यांच्या जातीचे जतन व त्या सुधारणे आणि त्यांच्या कत्तलीस मनाई करणे याकरिता राज्य उपाययोजना करील असा आहे. शेती ही नैसर्गिक पद्धतीने व्हावी. शेती कसताना मर्यादित यांत्रिकीकरणासोबत गुरांचा-जनावरांचाही भरपूर उपयोग व्हावा यासाठी सरकारने मदत आणि प्रोत्साहन द्यायला पाहिजे. त्यासाठी कंपोस्ट खते, गांडूळ खत, जैविक किटकनाशके आणि नैसर्गिक-जैविक पद्धतीने पिकविलेल्या शेतमालाला रास्त भावाची हमी सरकारने द्यावी अशी अपेक्षा आहे. त्यामुळे शेतीचा नैसर्गिक पोत आणि कस वाढेल, हे या कलमातून अपेक्षित आहे. मात्र सरकार त्यासाठी फार काही करताना दिसत नाही. दुसरे म्हणजे या कलमात फक्त ' गोवंश' हा शब्द नाही तर ' गाई व वासरे आणि इतर दुभती व जुंपणीची गुरे' असा उल्लेख आहे. शेळी, मेंढी, म्हैस, उंटीण या दूध देतात, तसेच हाल्या किंवा उंट आणि अन्य जनावरे त्या त्या भागात शेतीच्या कामासाठी जुंपतात, मग काही लोकांचे फक्त गाई-बैलावरच इतके प्रेम का? मुक्या जिवावरच्या प्रेमाचा मुद्दाही फक्त गाई-बैलापुरताच का? म्हैस, बकरी, मेंढी कोंबडी ही मुकी जनावरे नाहीत का? बंदीच घालायची तर गाई-बैलासह उंट, म्हैस, हाल्या, शेळी, मेंढी, कोंबडी अशा सर्वच मुक्या तसेच दुभत्या व जुंपणीच्या जनावरांच्या कत्तलीस मनाई केली पाहिजे. आज गोवंश हत्या बंदीच्या कलमाने सर्वांत जास्त जर कोणी अडचणीत आले असतील तर ते आहेत दुष्काळात होरपळणारे शेतकरी. घरातल्या पोराबाळांचे पोट कसे भरायचे? उपयोगातल्या जनावरांच्या चारा-पाण्याची सोय कशी करायची? पोरीच्या शिक्षणाचा खर्च कुठून करायचा? अशा अनंत प्रश्नांनी हैराण असलेल्या शेतकर्यांच्या गळ्यात भाकड जनावरे सांभाळण्याची जबाबदारी टाकून शेतकर्याचे आधीच बिघडलेले अर्थकारण पूर्णच संपविण्याचे काम गोवंश हत्या बंदी कायद्याने केले आहे. पण कत्तल तर होतच राहते, त्याशिवाय का एन.डी.ए. सरकारच्या काळात विक्रमी बीफ निर्यात झालेली दिसली असती. या कायद्याने होते एवढेच की

बाजारातील जनावरांच्या किंमती पडतात आणि पोलिसांना भ्रष्टाचाराचे आणखी एक कुरण वाढते. या सगळ्यात मरतो फक्त शेतकरी. जनावरे सांभाळली पाहिजेत, जनावरे वाढविली पाहिजेत आणि नैसर्गिक शेतीला प्रोत्साहन मिळाले पाहिजे. पण ते करताना ते जनावर मरेपर्यंत सांभाळण्याचे ओझे आधीच अडचणीत असलेल्या शेतकर्यावर कशासाठी? शिवाय यानिमित्ताने कोणी काय खावे आणि काय खाऊ नये असे अनावश्यक फतवे काढून सरकार मूलभूत अधिकारांचे हनन करत आहे. या बाबतीत शेतकरीहित आणि विवेकी विचारांच्या आधारे निर्णय करणे संविधानाच्या दृष्टीनेही योग्य ठरेल.

हा मुद्दा समवर्ती सूचीत आहे, तरीही केंद्र सरकार मात्र याबाबत कायदा करत नाही, म्हणजे जिथे फायदा वाटतो त्या राज्यात गोवंशबंदी कायदा करायचा आणि जिथे नुकसान होईल असे वाटते तिथे हा कायदा करायचा नाही असे आहे का? अलीकडील काळात स्वतःला गोरक्षक म्हणविणार्यांनी गोहत्येच्या संशयावरून, गाईचे मांस बाळगल्याच्या संशयावरून मुस्लीम समाजातील, दलित समाजातील नागरिकांना मारहाण करण्याच्या, जीवे मारण्याच्या अनेक घटना समोर आल्या आहेत. एका प्रसंगात तर महिलांनाही मारहाण करण्यात आली. ज्या राज्यात गोवंशहत्या बंदी कायदा आहे तिथे जर कोणी हा कायदा मोडला तर अटकेची कारवाई आणि शिक्षा देण्यासाठी यंत्रणा उपलब्ध असताना स्वतःला गोरक्षक म्हणवणारे कायदा हातात घेऊन ही जी कृत्ये करतात हे बेकायदेशीर आहे, ती शुद्ध गुंडगिरी आहे; पण पोलीस आणि प्रशासन या घटना पुरेशा गांभीर्याने घेत नाहीत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी हे गोरक्षक म्हणजे समाजकंटक असून त्यांची दुकानदारी मोडून काढली पाहिजे असे स्पष्ट विधान केल्यानंतर तरी परिस्थितीत फरक पडेल अशी आशा करूया. पंतप्रधानांचे विधान स्वागतार्ह आहे; पण अशा संवेदनशील घटनांनंतर पंतप्रधान प्रतिक्रिया द्यायला खूपच उशीर का लावतात हे अनाकलनीय आहे. • •

# नागरिकांची मूलभूत कर्तव्ये

संविधानाच्या भाग चार मध्ये कलम 51क मध्ये नागरिकांची मूलभूत कर्तव्ये दिलेली आहेत. संविधानाच्या 42 व्या घटनादुरुस्तीनुसार ही कलमे संविधानाचा भाग बनली आहेत. आपण ती महत्त्वपूर्ण कलमे जशीच्या तशी पाहूया.

क: संविधानाचे पालन करणे आणि त्याचे आदर्श व संस्था, राष्ट्रध्वज व राष्ट्रगीत यांचा आदर करणे.

ख: ज्यामुळे आपल्या स्वातंत्र्यलढ्यास स्फूर्ती मिळाली त्या उदात्त आदर्शांची जोपासना करून त्यांचे अनुसरण करणे.

ग: भारताची सार्वभौमता, एकता व एकात्मता उन्नत ठेवणे व त्यांचे संरक्षण करणे.

घ: देशाचे संरक्षण करणे व आवाहन केले जाईल तेव्हा राष्ट्रीय सेवा बजावणे.

ङ: धार्मिक, भाषिक व प्रादेशिक किंवा वर्गीय भेदांच्या पलीकडे जाऊन भारतातील सर्व जनतेमध्ये सामंजस्य व बंधुभाव वाढीला लावणे; स्त्रियांच्या प्रतिष्ठेला उणेपणा आणणार्या प्रथांचा त्याग करणे.

च: आपल्या संमिश्र संस्कृतीच्या समृद्ध वारशाचे मोल जाणून तो जतन करणे.

छ: वने, सरोवरे नद्या व वन्य जीवसृष्टी यासह नैसर्गिक पर्यावरणाचे रक्षण करून त्यात सुधारणा करणे आणि प्राणिमात्रांबद्दल दयाबुद्धी बाळगणे.

ज: विज्ञाननिष्ठ दृष्टिकोन, मानवतावाद आणि शोधकबुद्धी व सुधारणावाद यांचा विकास करणे.

झ: सार्वजनिक मालमत्तेचे रक्षण करणे व हिंसाचाराचा निग्रहपूर्वक त्याग करणे.

ञ: राष्ट्र सातत्याने, उपक्रम व सिद्‌धी यांच्या चढत्या श्रेणी गाठत जाईल अशा प्रकारे व्यक्तिगत व सामुदायिक स्वरूपाच्या सर्व कार्यक्षेत्रात पराकाष्ठेचे यश संपादन करण्यासाठी झटणे.

टः मातापित्याने किंवा पालकाने सहा ते चौदा वर्षांदरम्यानचे आपले अपत्य किंवा, यथास्थिति, पाल्य याला शिक्षणाच्या संधी देणे.

ही प्रत्येक भारतीय नागरिकाची कर्तव्ये असतील.

भारतीय संविधानाने नागरिकांकडून अपेक्षिलेली ही मूलभूत कर्तव्ये पुरेशी स्वयंस्पष्ट आहेत. नागरिकांकडून राष्ट्रध्वज आणि राष्ट्रगीताचा आदर अपेक्षित आहे, स्वातंत्र्यलढ्यातील आदर्शांची जोपासना, देशाच्या सार्वभौमतेचे आणि एकतेचे संरक्षण, सामंजस्य आणि बंधुभावाची भावना, भारताच्या संमिश्र संस्कृतीच्या वारशाचे जतन, पर्यावरणाचे रक्षण, विज्ञाननिष्ठ दृष्टिकोन आणि सुधारणावाद यांचा विकास, हिंसाचाराचा त्याग आणि सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान टाळणे ही महत्त्वाची कर्तव्ये अपेक्षित आहेत. सर्वांत महत्त्वाचे म्हणजे महिलांच्या प्रतिष्ठेला उणेपणा आणणार्या प्रथांचा त्याग आपल्याकडून अपेक्षित आहे. याचा आपण सर्वांनी गंभीरपणे विचार केला पाहिजे. सार्वजनिक ठिकाणी महिलांबाबतची उथळ किंवा अश्लील शेरेबाजी जशी निंदनीय आहे, मुलींची छेडछाड जशी निंदनीय आहे, तसेच दुसर्या बाजूला मूल नसलेल्या किंवा विधवा महिलांचा माणूस म्हणून सन्मान अपेक्षित आहे, अगदी घरातही महिलांच्या बाबतीतील अनेक सवयी-नेहमीच्या वापरातील अवमानजनक शब्द आपण टाळणे अपेक्षित आहे.

संविधान आणखी एका महत्त्वाच्या कर्तव्याबद्‌दल बोलते. प्रत्येक नागरिकाने आपल्या कार्यक्षेत्रात पराकाष्ठेचे यश संपादन करण्यासाठी झटायचे आहे जेणेकरून राष्ट्र उपक्रम व सिद्‌धीच्या चढत्या श्रेणी गाठत जाईल. हे फार महत्त्वाचे कर्तव्य आहे. वेळेची शिस्त पाळणे, ठरलेली कामे वेळच्यावेळी पूर्ण

करणे, कामे नावीन्यपूर्ण पद्धतीने करणे, कमी वेळेत व कमीत कमी साधने आणि ऊर्जा वापरून कामे पूर्ण करण्याच्या नव्या पद्धती शोधणे, जेणेकरून राष्ट्राच्या विकासाला आपला जास्तीत जास्त हातभार लागेल हे प्रत्येक नागरिकाने पाहिले पाहिजे.

मला असे वाटते की या सर्व कर्तव्यांचा जर एकत्रित विचार केला तर ही कर्तव्ये एका परिपूर्ण अशा मुल्यव्यवस्थेचा आग्रह धरतात. आपण ही कर्तव्ये तितक्याच गंभीरपणे घेऊन ती जास्तीत जास्त परिणामकारक रितीने आचरणात आणली पाहिजेत.

संविधानात समाविष्ट केलेल्या मूलभूत कर्तव्यांची अंमलबजावणी कशी होईल याबाबत सूचना देण्यासाठी 1998 साली केंद्र शासनाने न्या. वर्मा यांचे अध्यक्षतेखाली एक आयोग नेमला आहे. या कर्तव्यांची अंमलबजावणी न्यायालयाकडून करवून घेण्याची तरतूद जरी नसली तरी ती पार पाडण्याचे बंधन व्यक्ती आणि राज्यावर आहे असे मत न्या. वर्मा आयोगाने आणि सर्वोच्च न्यायालयानेही वेगवेगळ्या खटल्यात नोंदविले आहे. समाजजीवनात याबाबत मोठ्या प्रमाणावर चर्चा अपेक्षित आहे आणि ही कर्तव्ये प्रभावीपणे कशी पार पाडली जातील याचे वेगवेगळे आयाम शोधण्याची गरज आहे. • •

# राष्ट्रभक्त कोणाला म्हणावे?

मध्यंतरी आपल्याकडे भारत माता की जय घोषणा देणे अथवा न देणे किंवा जबरदस्तीने द्यायला लावणे अशी उलटसुलट चर्चा होऊन त्याचा संबंध राष्ट्रभक्तीशी जोडला गेला होता. देशाबद्दल प्रेम असलेच पाहिजे आणि ते प्रकटही झाले पाहिजे. पण एखादा जर असे म्हणाला की मी भारत देशाचा विजय असो असे म्हणेल किंवा जय हिंद असेही म्हणेल तर आपण त्याला, नाही तू ‘ भारत माता की जय’  असेच म्हटले पाहिजे तरच तू राष्ट्रभक्त अशी

जबरदस्ती त्याच्यावर करता येईल काय? दुसरा मुद्दा म्हणजे, एखादी व्यक्ती * घरातील महिलांशी अरेरावीने वागत असेल, मारझोड करत असेल किंवा * एखादी व्यक्ती सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान करण्यात आघाडीवर असेल किंवा * एखादी व्यक्ती दुसर्या धर्मातील/जातीतील लोकांबद्दल सतत द्वेषभावना पसरवीत असेल किंवा * एखादी व्यक्ती व्यापारात/व्यवसायात गरजेपेक्षा जास्त नफा कमावून जनतेला लुबाडत असेल किंवा * एखादा सरकारी नोकर वैयक्तिक कामात वेळ वाया घालवत असेल आणि त्याच्या कार्यालयात कामासाठी आलेल्या नागरिकास हेलपाटे घालायला लावून मानसिक-आर्थिक त्रास देत असेल किंवा * एखादा सरकारी अधिकारी मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार करत असेल किंवा * एखादा विद्यार्थी अभ्यास न करता कॉपी करून पास होत असेल किंवा * एखादी कायम नेमणुकीवर असलेली प्राध्यापिका गलेलठ्ठ पगार घेऊनही स्वतःच्या शिकवण्याच्या कामाबद्दल गंभीर नसेल आणि अशा सर्व व्यक्ती दररोज झोपेतून उठल्यावर आणि झोपायला जाण्यापूर्वी न चुकता ‘ भारत माता की जय’  म्हणत असतील तर केवळ तेवढ्याने त्या व्यक्ती राष्ट्रभक्त ठरतील काय? राष्ट्रावरचे प्रेम हे आदर्श नागरिकत्वातून सिद्ध झाले पाहिजे आणि आदर्श नागरिकत्व हे संविधानातील या मूलभूत कर्तव्यांचे पालन कोण किती करतो यावर ठरले पाहिजे. शिवाय राष्ट्रावरील आपले प्रेम हे डोळस असले पाहिजे. अंध राष्ट्रभक्ती ही कामाची नाही. पाकिस्तानी लष्कर, गुप्तहेर संघटना आय. एस. आय. यांच्या कारवायांनी भारत त्रस्त आहे, परेशान आहे, नुकसान सोसतो आहे तर योग्य अशा राजनैतिक मार्गांनी पाकिस्तानची नाकाबंदी केली पाहिजे, त्याच्यावरील दबाव वाढविला पाहिजे, आंतरराष्ट्रीय राजकारणातील दबावतंत्राचा यासाठी उपयोग केला पाहिजे, सर्व मार्गांनी भारताच्या हितरक्षणाची भूमिका भारत सरकारने घेतलीच पाहिजे; पण त्यासाठी पाकिस्तान सरकारच्या चुकीच्या धोरणांचे दुष्परिणाम भोगत असलेल्या पाकिस्तानच्या गरीब जनतेला शत्रू मानून तिचा द्वेष करण्याने काहीच साध्य होणार नाही. आपली राष्ट्रभक्ती सर्व अर्थांनी डोळस आणि विवेकी असली पाहिजे.

• •

## धर्मनिरपेक्षता आणि भारतीय संविधान

संविधानातील कलम 15 आपण वाचले आहे. या कलमानुसार धर्माच्या आधारे नागरिकांमध्ये कुठलाही भेदभाव सरकारला करता येणार नाही असे स्पष्टपणे नोंदविले आहे. संविधान कुठेही एका विशिष्ट धर्माबद्दल भाष्य करत नाही. याचा अर्थ सरकारला कुठलाही धर्म नसेल. सरकार कुठल्याही एका धर्माच्या बाजूने पक्षपाती कृती करणार नाही. सरकारचा कारभार धर्मनिरपेक्ष म्हणजे धर्माचा विचार न करता चालविला जाईल. दुसर्या बाजूला नागरिकांनी विज्ञाननिष्ठ दृष्टिकोन, सुधारणावाद आणि शोधकबुद्धीचा अंगीकार करावा असे नागरिकांच्या कर्तव्यात सांगितले आहे. 25 व्या कलमाने नागरिकांना सद्सद्विवेकबुद्धीचा व धार्मिक आचरणाचा अधिकार देताना त्याला काही मर्यादाही घातल्या आहेत. सार्वजनिक शांतता, सार्वजनिक आरोग्य आणि सामान्य नितीतत्व याला अधीन राहून नागरिकांना धार्मिक आचरण अथवा उपासनेचे स्वातंत्र्य संविधानाने दिले आहे. म्हणजेच एखाद्याची उपासना पद्धती किंवा धार्मिक आचरण जर सार्वजनिक शांततेला बाधा आणत असेल, सार्वजनिक आरोग्य बिघडवीत असेल किंवा सामान्य नितीतत्वाला धाब्यावर बसवीत असेल तर अशा धार्मिक आचरणाला थांबविण्याचा, लगाम घालण्याचा अधिकार राज्याला असेल. 25 व्या कलमात पुढे असेही म्हटले आहे की धर्माचरणाशी निगडित असलेल्या आर्थिक, वित्तीय, राजनैतिक वा अन्य धर्मिकेतर कार्याचे विनियमन करण्यासाठी वा त्यावर निर्बंध घालण्यासाठी कायदा करण्यास राज्याला या कलमाचा प्रतिबंध असणार नाही. सामाजिक कल्याण व सुधारणा याबाबत अथवा सार्वजनिक स्वरूपाच्या हिंदू धार्मिक संस्था,

हिंदूंचे सर्व वर्ग व पोटभेद यांना खुल्या करण्याबाबतच्या तरतुदी करण्यासही 25 व्या कलमाचा अडथळा असणार नाही असेही याच कलमात संविधान निर्मात्यांनी नोंदविले आहे. याचाच अर्थ असा आहे की, * समाजाच्या एका वर्गात प्रचंड गरिबी आणि कुपोषण असताना शनिदेवाच्या मूर्तीवर तेल वाहणे किंवा महादेवाच्या पिंडीवर दूध वाहणे. * रस्त्यात वाहतुक कोंडी होत असताना दर्गा किंवा मंदीर रस्त्यातून हलवण्यास विरोध करणे. * माझ्या मुलीचे लग्न कोणत्या वयात करावे यात सरकारने पडू नये असे म्हणणे * महिलांना बुरखा घालण्याची सक्ती करणे असे अनेक मुद्दे हे धर्मस्वातंत्र्याचा भाग असूच शकत नाहीत.

संविधानाने नागरिकांना धार्मिक आचरणाचा अधिकार काही मर्यादा घालून तर दिलेला आहेच पण पुन्हा हा अधिकार व्यक्तीला दिलेला आहे. म्हणजेच एकाच कुटुंबातील किंवा जन्माने एका धर्मातील सज्ञान व्यक्तींना हा अधिकार स्वतंत्रपणे दिलेला आहे. काय करायचे ते त्या त्या व्यक्तीने ठरवायचे आहे. आपल्या आध्यात्मिक उन्नतीसाठी जन्माने मिळालेला धर्म योग्य वाटला तर व्यक्ती त्या धर्माप्रमाणे आचरण करू शकते किंवा आध्यात्मिक उन्नतीसाठी दुसराच एखादा धर्म योग्य वाटला तर त्या धर्माच्या पद्धतीने व्यक्ती उपासना करू शकते. आणि आजचे सर्व धर्म त्या त्या धर्मातील पुरोहितांच्या उपजीविकेचे व्यवसाय बनले आहेत, धर्माची जी काही नैतिक शिकवण असेल तिचा आणि प्रत्यक्ष व्यवहाराचा काही संबंध उरलेला नाही, सर्वच धर्माचा व्यवहार हा कर्मकांडांच्या भोवती फिरतो आहे, धर्मस्थळे ही बाजाराची आणि गडबड-गोंधळाची केंद्रे बनली आहेत, धर्माच्या नावाने महिलांवर अन्याय होतो आहे, त्यांच्यावर दुय्यम भूमिका लादली जात आहे, असे जर एखाद्या नागरिकाचे मत बनले असेल आणि तो नागरिक, ‘ खरा तो एकची धर्म, जगाला प्रेम अर्पावे’ अशी माझी भूमिका आहे असे म्हणत असेल तर त्या नागरिकास तसे म्हणायचा अधिकारही 25 व्या कलमाने दिला आहे. त्या दृष्टीने 25 व्या कलमाचे पहिले दोन शब्द सद्सद्विवेकबुद्धीचे स्वांतत्र्य हे फारच महत्त्वाचे आहेत. वरती आध्यात्मिक उन्नती हा शब्द वापरला आहे. धर्माचे पालन हे खर्या अर्थाने

आपल्या मनामध्ये झाकून बघण्याची प्रक्रिया असते. उपासना म्हणजे आत्मपरीक्षण करत आपले आचरण अधिक निर्दोष बनविण्यासाठी कधीतरी शांतपणे बसून, सृष्टीशी (निसर्गाशी) तादात्म्य साधण्याची प्रक्रिया असते. म्हणजेच उपासना ही स्वतःला अधिक निर्मल आणि उन्नत बनविण्यासाठी असते. आजच्या बहुतेक धर्मस्थानांच्या भोवतीचा व्यवहार आणि बर्याच धार्मिक पुढार्यांचे फूत्कार जर ऐकले तर त्यांचा आणि नैतिक शिकवणुकीचा किंवा त्यांचा आणि आत्मिक उन्नतीचा काहीतरी संबंध आहे का असा सहज प्रश्न पडतो. जो आपले-तुपले शिकवितो, जो कुणाचा तरी द्वेष शिकवितो, जो प्रसंगी हिंसेला उद्युक्त करतो, जो केवळ पुरोहिताचे पोट भरण्यासाठी कार्यरत राहतो, तो खरा धर्म कसा काय असू शकतो? संत परंपरेने अनेक अर्थांनी मानवतावादाची, उदारमतवादाची शिकवण दिली आहे. त्याचबरोबर संत परंपरेने भक्त आणि देव यांच्यातील स्वार्थरहित, निर्मळ अशा नात्याची मांडणी केली आहे. कुठल्याही प्रकारच्या मध्यस्थाविना भक्त आणि देव यांचे थेट नाते जोडणार्या साध्या-सोप्या आणि सरळ अशा उपासनेची पद्धती त्यांनी दिली आहे. ती भागवत परंपरेतील संतांनी दिली आहे तशीच सुफी संतांनी पण दिली आहे. ‘ कांदा मुळा भाजी, अवघी विठाई माझी’  या एका ओळीत केवढा अर्थ भरला आहे. मी शेतकरी आहे आणि मी जर काळ्या आईच्या मशागतीत घाम गाळून कांदा, मुळा, भाजीपाला पिकवीत असेल तर मला पांडुरंगाच्या भेटीसाठी कुठलेही कर्मकांड करायची गरज नाही, किंबहुना मला पंढरीला जाण्याची पण गरज नाही, माझे काम करत असताना, काळ्या आईच्या मशागतीत घाम गाळत असताना मी पिकविलेल्या भाजीपाल्यातच माझा विठोबा मला भेटेल. प्रत्येकाने आपले काम करत राहावे, कामातच तुम्हाला तुमचा देव भेटेल. केवढी उदात्त भावना! हा खरा उपासनेचा अर्थ. या अर्थाने जर तपासले तर आज आपल्या अवतीभोवती धर्माच्या नावाने जो बाजार मांडलेला दिसतो तो म्हणजे धर्माच्या नावाने सुरू असलेला अधर्म आहे असे उद्वेगाने म्हणावे लागते. धार्मिक स्वातंत्र्याच्या कलमाची

सुरुवात सद्सद्विवेकबुद्धीचे स्वातंत्र्य या शब्दांनी करताना संविधान निर्मात्यांना धार्मिक आचरणाचा असाच उदात्त अर्थ अपेक्षित असणार हे नक्की.

युरोप मध्ये जेव्हा राजा आणि पोप म्हणजेच राज्यव्यवस्थेचा प्रमुख आणि धर्मव्यवस्थेचा प्रमुख यांच्यात संघर्ष झाला, हिंसाचार झाला तेव्हा चर्चेअंती एक सूत्र पुढे आले ते असे, राजाचे राजाला द्या आणि पोपचे पोपला द्या. म्हणजेच राजाच्या क्षेत्रात पोपने ढवळाढवळ करायची नाही आणि पोपच्या क्षेत्रात राजाने ढवळाढवळ करायची नाही. या सूत्रापेक्षा भारतीय संविधानातील धर्मनिरपेक्षतेची संकल्पना एक पाऊल पुढे गेलेली आहे. आपल्याकडे जन्मापासून मरेपर्यंत माणसाच्या जीवनाचा पगडा वेगवेगळ्या निरर्थक धार्मिक कर्मकांडांनी घेतलेला असल्याने, संविधानाने उपासना स्वातंत्र्याला घातलेल्या मर्यादा जर कोणी ओलांडल्या तर अशा उपासना स्वातंत्र्याला पायबंद घालण्याचा अधिकार राज्यव्यवस्थेला संविधान निर्मात्यांनी दिला आहे. धर्मस्वातंत्र्य हे ‘ धर्म’ नावाच्या संस्थेला नाही तर व्यक्तीला दिले आहे. राज्याला मात्र कुठलाही धर्म असणार नाही. संविधानातील धर्मनिरपेक्षतेची ही संकल्पना नागरिकांनी आणि राज्याने दोघांनीही नीट समजून घेतली तर आपल्या समाजासमोरचे अनेक प्रश्न सुटू शकतील. • •

# धर्मनिरपेक्षतेचे राजकारण की धर्मनिरपेक्ष मुद्यांचे राजकारण

धर्मनिरपेक्षता या शब्दाचा अर्थ काय यावर आपल्याकडे खूपच कीस काढला जातो आणि तरीही गोंधळ कायम राहतो किंबहुना वाढतो. धर्मनिरपेक्षता हा मुद्दा आपल्याकडे कायम हिंदू-मुस्लीम किंवा हिंदू-ख्रिश्चन अशा संदर्भातच चर्चिला जातो. वास्तविक ज्या देशात एकाच धर्माचे लोक राहतात त्या देशातही धर्मनिरपेक्षता हे मूल्य आवश्यक असते. खरा मुद्दा असा आहे की आपण पुन्हा

पुन्हा धर्मनिरपेक्षतेचीच चर्चा करत राहणार की सार्वजनिक जीवनात सक्रिय होण्यासाठी धर्मनिरपेक्ष मुद्दे शोधणार. म्हणजे असे की सर्व जातिधर्मांचे स्त्री-पुरुष ज्यासाठी सहजपणे एकत्र जमू शकतात तो धर्मनिरपेक्ष मुद्दा असतो. अनेकजण आपापल्या धर्माचे सण, उत्सवात उत्साहाने सामील होतात. जातीनुसार वाटून घेतलेल्या महापुरुषांचे जयंती कार्यक्रम धूमधडाक्यात साजरे करतात पण जिथे सर्व भारतीय सामील होऊ शकतात अशा राष्ट्रीय सणांच्या वेळी अनेकजण फिरायला कसे जातात. ज्या दिवशी अन्य कुठल्याही उत्सवापेक्षा आणि जयंतीपेक्षा 26 जानेवारी, 15 ऑगस्ट आणि 26 नोव्हेंबर म्हणजे राज्यघटना दिन अधिक उत्साहात साजरे होतील त्या दिवशी भारताच्या प्रगतीची दारे खर्या अर्थाने खुली होतील.

त्याचप्रमाणे पिण्याचे पाणी मिळावे म्हणून काढलेला मोर्चा, शिक्षण हक्क कायद्याची अंमलबजावणी व्हावी म्हणून केलेले धरणे आंदोलन, रोजगार मिळावा म्हणून मंत्र्याला घातलेला घेराव ही धर्मनिरपेक्ष आंदोलने असतात कारण त्या प्रश्नांचा त्रास सर्व जाती-धर्मातील स्त्री-पुरुषांना होत असतो. म्हणजेच धर्मनिरपेक्षतेवरून राजकारण करण्याऐवजी जिथे सर्व जाती-धर्माचे स्त्री-पुरुष भारतीय या नात्याने एकत्र जमू शकतील असे धर्मनिरपेक्ष मुद्दे शोधून त्यांचे राजकारण करणे भारताच्या हिताचे ठरेल. • •

# सामाजिक न्यायाची संकल्पना आणि भारतीय संविधान

उद्याचा भारत हा सार्वभौम, समाजवादी, धर्मनिरपेक्ष, लोकशाही गणराज्य घडविण्याचे स्वप्न संविधानाने पाहिले आहे. भारतातील जातिव्यवस्था आणि पुरुषी वर्चस्व असणारी समाजव्यवस्था जर लक्षात घेतली तर सामाजिक न्यायाच्या सूत्राची प्रभावी अंमलबजावणी केल्याशिवाय हे स्वप्न पूर्ण होणे शक्य नाही. संविधान समतेबद्दल आग्रहाने बोलते पण इथे गणिती समानता नक्कीच

अभिप्रेत नाही तर जैविक समानता अपेक्षित आहे. भारतात हजारो वर्षापासून काही जातीसमूहांना श्रेष्ठत्व व विशेष संधी बहाल करण्यात आल्या, तर खालच्या जातीतल्या मानल्या गेलेल्या जातीसमूहांना जन्माच्या आधारे शिक्षणाची संधी, मालमत्ता धारण करण्याचा अधिकार जन्माच्या आधारे नाकारला गेला. तसेच असे जातीसमूह ज्या श्रमाच्या कामातून पोट भरत असत त्या श्रमाला इथल्या व्यवस्थेने कायम प्रतिष्ठा आणि किंमत नाकारली. हजारो वर्षांच्या या अन्यायातून आणि शोषणातून शोषित जातीसमूहांमध्ये जे मागास सांस्कृतिक संचित तयार झाले ते आज भारताच्या सर्वसमावेशक आणि संतुलित विकासात मोठाच अडथळा आहे. या जातीप्रथेला धर्माची मान्यता होती आणि धर्मचिकित्सेला बंदी होती. आजही विधायक धर्मचिकित्सेची भूमिका घेणार्या दाभोलकर-पानसरे-कलबुर्गी यांना दिवसाढवळ्या गोळ्या घातल्या जातात तर जुन्या काळात काय परिस्थिती असेल? त्यामुळेच स्वातंत्र्यानंतरच्या भारतात दलित, आदिवासी आणि मागास जातीसमुहांना विशेष संधीद्वारे पुढारलेल्या समाजाच्या बरोबरीला आणणे व सामाजिक न्यायाची प्रस्थापना करणे ही भूमिका संविधानाने घेणे अगदीच स्वाभाविक होते. अशाच पद्धतीची भूमिका पुरुषी वर्चस्वाखाली दडपल्या गेलेल्या महिलांसाठीही संविधान घेताना दिसते.

सामाजिक न्यायाच्या बाबत संविधानात काय काय तरतुदी आहेत आपण पाहूया.

मूलभूत अधिकारांच्या भागातील कलम 15 आणि कलम 16 आपण पूर्वी वाचले आहेत.

* कलम 15 नुसार धर्म, वंश, जात, लिंग किंवा जन्मस्थान या कारणावरून नागरिकांमध्ये भेदभाव करण्यास मनाई आहे मात्र भारतातील सामाजिक, आर्थिक विषमता लक्षात घेता महिला, बालके, सामाजिक-शैक्षणिकदृष्टया मागासवर्ग (ओ.बी.सी.), अनुसूचित जाती (एस.सी.) आणि जनजाती

(एस.टी.) यांच्या कल्याणासाठी विशेष तरतूद करण्यास या कलमाचा कुठलाही प्रतिबंध असणार नाही.

* तर कलम 16 असे सांगते की, राज्याच्या नियंत्रणाखालील कोणत्याही पदावरील सेवायोजन किंवा नियुक्ती या बाबींमध्ये सर्व नागरिकांना समान संधी असेल मात्र इतर मागासवर्गीय, अनुसूचित जाती आणि जनजातींना राज्याच्या नियंत्रणाखालील सेवांमध्ये पर्याप्त प्रतिनिधित्व मिळालेले नसल्यास त्यांच्यासाठी पदे राखून ठेवण्याची अथवा आरक्षणाची तरतूद करण्यास राज्यास प्रतिबंध होणार नाही

आरक्षणाच्या बाबतीत लिहिताना संविधान निर्मात्यांनी पर्याप्त प्रतिनिधित्व हा जो शब्द वापरला आहे तो फारच महत्त्वाचा आहे. आपण बर्याच वेळा आरक्षणाचा विचार हा वैयक्तिक लाभ अथवा वैयक्तिक अन्याय या अंगाने करतो. संविधान मात्र ज्या जातीसमुहांना इतिहास काळात व्यवस्थेने मागे ठेवले त्या जाती समुहांना विविध सत्ताकेंद्रांमध्ये पर्याप्त प्रतिनिधित्व देण्यासाठी आरक्षणाचा विचार करते हे आपण नीट समजून घेतले पाहिजे.

सामाजिक न्यायाच्या बाबतीत अन्य महत्त्वाची कलमे,

* अस्पृश्यता नष्ट करणे (कलम 17)

* माणसांचा अपव्यापार आणि वेठबिगारीस मनाई (कलम 23)

* अनुसूचित जाती, अनुसूचित जनजाती आणि इतर दुर्बल घटक यांचे शैक्षणिक व आर्थिक हितसंवर्धन (कलम 46)

* लोकसभेत अनुसूचित जाती (एस.सी.) व अनुसूचित जनजाती (एस.टी.) यांच्याकरिता जागा राखून ठेवणे (कलम 330)

* राज्यांच्या विधानसभेत अनुसूचित जाती व अनुसूचित जनजाती यांच्याकरिता जागा राखून ठेवणे (कलम 332)

* सेवा व पदे यावर अनुसूचित जाती व अनुसूचित जनजाती यांचे हक्क (कलम 335)

* अनुसूचित जाती राष्ट्रीय आयोगाची तरतूद (कलम 338)

* अनुसूचित जनजाती राष्ट्रीय आयोगाची तरतूद (कलम 338क)

* मागासवर्गांच्या (ओ.बी.सी.) स्थितीचे अन्वेषण करण्यासाठी आयोगाची नियुक्ती (कलम 340)

जातीप्रथेने दलित-शोषित जातीसमुहांचे शोषण केले ही झाली एक महत्त्वाची बाजू त्याचबरोबर दुसर्या बाजूला जातीप्रथेच्या बंदिस्त व अपरिवर्तनीय स्वरूपाने सर्वच भारतीय समाजाचे मोठे नुकसान झालेले दिसते. जातीप्रथेने भारतीय समाजाची नवे काही तरी करून दाखविण्याची ऊर्मी मारली, धाडस करून नव्या वाटा चोखाळण्याची प्रवृत्ती मारली, समाजाची सर्जनशीलताच मारली गेली. इथल्या पुरोहितवर्गाने शिवाजी महाराज व शाहू महाराजांसारख्या राजांना शूद्र मानले हे आपण जाणतोच. त्यांनी महिलांना शिकविणे हे धर्मशास्त्रानुसार पाप मानले. भारतीय स्वातंत्र्याचे नेते लोकमान्य टिळक जेव्हा स्वातंत्र्याच्या कामासाठी इंग्लंडला जाऊन आले तेव्हा समुद्रप्रवास हे पाप असल्याने लोकमान्य टिळकांनी प्रायश्चित घेतले पाहिजे अशी भूमिका पुण्यातील पुरोहितवर्गाने घेतली. सामाजिक प्रश्नांबाबत लोकमान्यांची मते प्रतिगामी असल्याने त्यांनीही या मागणीपुढे मान तुकवत प्रायश्चित घेतले. गंमत पहा, एका बाजूला युरोपियन समाज विज्ञानाचा स्वीकार करत होता, औद्योगिकीकरणाचा मार्ग चोखाळत होता, कारखाने उभारून उत्पादन वाढवत होता, त्या उत्पादनाला बाजारपेठ मिळविण्यासाठी धाडसी समुद्रमोहिमा आखत होता, नवे नवे प्रदेश त्यासाठी शोधत होता आणि दुसर्या बाजूला आपण मात्र आपल्या त्या काळातील सर्वोच्च

राजकीय नेत्याला स्वातंत्र्याच्या कामासाठी समुद्रप्रवास केला म्हणून प्रायश्चित्त घ्यायला लावत होतो. कर्मठ रीतीरिवाज, निरर्थक धार्मिक कर्मकांड आणि धर्माच्या मान्यतेने उभ्या असलेल्या जातीप्रथेने आपल्या समाजातले चैतन्य आणि क्रियाशीलताच मारली गेली. आपल्या देशात अनेकांना युरोप-अमेरिकेचे भारी प्रेम असते त्यांनी त्यांच्यातला आणि आपल्यातला हा फरक नीट समजून घेतला पाहिजे. नाहीतर तिथे जाऊन पुन्हा निरर्थक कर्मकांडाच्या निमित्तानेच भेटणारी महाराष्ट्रीयन मंडळे दिसतातच.

समाजाला पुढे घेऊन जाण्यासाठी विविध जबाबदार्या पार पाडणारी माणसे जर समाजातल्या सर्व घटकांतून निवडली गेली नाही तर समाजाला उत्तम कर्तृत्व असणारी माणसे मिळणार कशी? समाजातील आधी आबादी मानल्या गेलेल्या महिलांना जर हजारो वर्षे केवळ चूल आणि मूल यातच अडकवून ठेवले तर हा महिलांवर अन्याय आहेच पण अर्ध्या लोकसंख्येची कल्पनाशक्ती, काही तरी करून दाखविण्याची ऊर्मी अशी मारल्याने नुकसान एकूण समाजाचेच होणार ना? दुसर्या बाजूला उन्हातान्हात घाम गाळत, श्रमाची कामे करणारे बहुसंख्य समूह हे नवनिर्मितीचे काम करत असतात. त्यांना संधी नाकारून केवळ बौद्धिक घटापटीचे काम करणार्या पांढरपेशा समाजातूनच विविध जबाबदार्यांसाठी माणसे निवडली जात असतील तर कामातील सर्जनशीलता मारली जाणार हे नक्की. आपल्याकडे डोके चालाविणार्यांनी श्रम करायचे नाहीत आणि श्रम करणारांना डोके चालवायला बंदी ही अनिष्ट परंपरा होती. आपल्या समाजाने बुद्धी आणि श्रमाची फारकत करून आपलेच फार मोठे नुकसान करून घेतले आहे.

विषमतेने ग्रस्त अशा समाजव्यवस्थेत गणिती समानतेचे नियम हा अन्याय ठरतो. ज्या समाजात सर्वजण एका रेषेवर नसतात त्या समाजात समान नियम सुद्धा अन्याय करत असतात. अशावेळी विशेष संधीद्वारे मागे राहिलेल्यांना पुढे आणण्याचा प्रयत्न करणे हाच सामाजिक न्याय असतो. इतिहास काळात समान संधी मिळाली नसेल तर मग त्या काळात ज्यांना संधी आणि माणूसपण

नाकारले गेले त्यांच्यासाठी थोडे डावे-उजवे करणे किंवा त्यांच्या बाजूने थोडा पंक्तिप्रपंच करणे हाच सामाजिक न्याय ठरतो. मागास जातीसमुहांना अशी संधी किती काळ देणार असा एक प्रश्न उभा केला जातो, अर्थातच विशेष संधी कायमसाठी किंवा अनंत काळापर्यंत चालू ठेवणे हे काही निरोगी समाजव्यवस्थेचे लक्षण नाही; पण हजारो वर्षांच्या मूठभरांसाठीच्या विशेष संधी आणि संविधानानंतरच्या भारतात 66 वर्षात मागासांसाठी अर्धवटपणे राबविलेल्या विशेष संधी यांची तुलना होऊ शकेल काय? यासाठी एक गृहपाठ कोणीही करून पहावा. कुठल्याही सरकारी आस्थापनेत वर्ग एक, वर्ग दोन, वर्ग तीन आणि वर्ग चारच्या कर्मचार्यांचे जातवास्तव तपासावे किंवा कुठल्याही महानगरपालिकेच्या चतुर्थश्रेणी सफाई कामगारांमध्ये फक्त दलित मानल्या गेलेल्या जातीतीलच लोकांचा भरणा कसा काय असतो हे कोणीही तपासून पहावे. त्यामुळे विशेष संधी अनंतकाळपर्यंत ठेवणे तत्त्व: योग्य नसले तरी आज त्या चालू ठेवणे गरजेचे आहे हेच वास्तव आहे.

आरक्षणाची धोरणे राबविताना अंमलबजावणीत काही दोष, उणिवा राहत असतील तर त्या दूर केल्याच पाहिजेत. विशेषतः त्या त्या आरक्षित प्रवर्गासाठी (कॅटेगरीसाठी) ज्या राखीव जागा असतील त्या राखीव जागा त्या प्रवर्गातील अधिक गरजू जाती आणि अधिक गरीब कुटुंबांपर्यंत कशा पोहोचतील यासाठी आवश्यक असे नियम बनविले पाहिजेत. एखाद्या विशिष्ट आस्थापनेत विशिष्ट प्रवर्गासाठी ज्या राखीव जागा असतील त्या अंतिमतः त्याच प्रवर्गातून भरल्या जातील हे नक्की करून मग असे नियम केले पाहिजेत.

## कमी होत चाललेला सरकारी टक्का आणि आरक्षणाचे भवितव्य

मुक्त अर्थकारणाच्या जमान्यात सरकार अनेक क्षेत्रातून माघार घेत असताना, सरकारचा कल्याणकारी योजनांचा टक्का घसरत असताना, सरकारी नोकरभरती जवळपास थांबलेली असताना आरक्षणाच्या कक्षेत येणार्या संधी कमी होत आहेत आणि आरक्षणाच्या मागण्या वाढत आहेत अशी विचित्र

परिस्थिती आहे. भारतात काम करणारे जे एकूण लोक आहेत, त्यांच्यापैकी 93 टक्के कामकरी हे असंघटित क्षेत्रात आहेत ज्यांना कुठलेही कामगार कायदे लागू नाहीत. अर्थातच तिथे आरक्षण नाही. उरलेल्या 7 टक्के संघटित कामगारांमध्ये निम्म्याहून जास्त कामगार जे खाजगी क्षेत्रात काम करतात तिथेही आरक्षण नाही. आणि शिल्लक राहिलेल्या सरकारी जागांमध्ये पन्नास टक्के आरक्षण आहे. त्यामुळे संपूर्ण आरक्षणाची चर्चा फारच थोड्या क्षेत्रासाठी असते. त्यामुळे सरकारने सर्व काही खाजगी क्षेत्रावर सोपवू नये. सरकारची विविध क्षेत्रातील गुंतवणूक वाढावी. सरकारी नोकरभरतीवरील अघोषित बंदी उठवावी या मुद्द्यावरही सर्वांचा भर असला पाहिजे.

भटके विमुक्त समाज

घरदार नसलेला, जमीन नावावर असण्याचा सुतराम संबंध नसलेला, मतदार यादी-आधारकार्ड-रेशनकार्ड यापासून कोसो दूर असणारा भटका समाज आजही समाजाच्या विचारप्रक्रियेपासून आणि विकासाच्या प्रवाहापासून दूरच आहे. यातील अनेक जमातीवरती गुन्हेगारीचा शिक्का बसलेला होता/आहे. त्यांनी जे केले त्याला गुन्हेगारी मानायचेच असेल तर ती कृत्ये ही पोट भरण्यासाठी होती. पोट भरण्यासाठीची चोरी आणि धनदांडग्यांची अय्याशीसाठीची चोरी एकाच मापात कशी मोजायची. काही ऐतिहासिक कारणांनी आणि त्यावेळच्या परिस्थितीमुळे भटके-विमुक्त समाजासाठी काही ठोस तरतुदी संविधानात आलेल्या दिसत नाहीत. स्वातंत्र्यानंतरच्या काही आंदोलनामुळे आणि काही आयोगांच्या सकारात्मक शिफारशीमुळे या समाजाचे प्रश्न चर्चेत आले व त्यातील थोडेफार मार्गी लागले. आज यातील काही जमाती जातपंचायत सारख्या घटनाबाह्य प्रक्रीयामुळे चर्चेत आहेत. मात्र शिक्षणाचा अभाव असणे, त्यामुळे अंधश्रद्धा भरपूर असणे, पुरुषी वृत्तीतून आलेले महिलांचे दुय्यमत्व असणे, हाताशी कुठलीच उत्पादनसाधने नसणे, पर्यायी रोजगार नसणे, नव्या स्वरूपातील रोजगारांमध्ये टिकून राहण्यासाठी त्या पद्धतीच्या कौशल्यांचा अभाव असणे आणि बाहेरील समाजाचा सततचा अविश्वास यामुळे हा समाज

अजूनही परिघाबाहेरच आहे. त्यांना विकासप्रक्रियेत सामावून घेण्यासाठी ठोस प्रयत्नांची गरज आहे.

- •

# आदिवासी समाजाच्या विकासाचे प्रश्न

राज्यघटनेने आदिवासी समाजास आरक्षणाचे संरक्षण दिले आहे.जंगलात राहणारे आदिवासी पोटापुरते जंगलाकडून घेतात आणि बदल्यात जंगल संवर्धनाचे काम मोठ्या प्रमाणावर करतात. ठेकेदार आणि काही भ्रष्ट वनअधिकारी यांच्या संगनमतातून जंगलतोड मोठ्या प्रमाणावर झाली. लोकसंख्येच्या दृष्टीने आदिवासी बहुल भागासाठी आदिवासी स्वशासन कायदा अस्तित्वात आहे. त्याला ' पेसा कायदा' म्हणतात.(PESA म्हणजे पंचायतराज एक्स्टेंशन टू शेड्युल्ड एरियाज). या कायद्याने आदिवासीबहुल गावात ग्रामसभांना काही विशेष अधिकार मिळाले आहेत. पण या कायद्याची अंमलबजावणी नीट होत नाही. आदिवासी विकासासाठी निर्धारित केलेला निधी फारच थोडा योग्य पद्धतीने खर्च होतो. बराचसा भ्रष्टाचारात वाहून जातो. आदिवासी समाजाचे स्वातंत्र्यलढ्यातील योगदान महत्त्वपूर्ण आहे. बिरसा मुंडा, तंट्या भिल्ल या आदिवासी नायकांचा इतिहास अजून नीट समोर आलेला नाही. मधल्या काळात ब्रिटिशकालीन वनकायद्याचा हवाला देऊन आदिवासीनांच जंगलातून हुसकावून लावण्याचे प्रयत्न सरकारने केले. बाकी समाजाच्या तुलनेत आदिवासी समाजात आजही शिस्तीत आणि चिवटपणे लढण्याची प्रवृत्ती टिकवून आहे. आदिवासी भागात अनेक जनसंघटना काम करतात. जिथे त्यांच्या जनसंघटना आहेत त्याही खूप शिस्तीत आणि प्रभावीपणे काम करतात. त्यांच्या अनेक वर्षांच्या संघर्षामुळेच वनाधिकार कायदा संसदेने मंजूर केला. जिथे जनसंघटना आहेत तिथे त्या वनाधिकार कायद्याच्या अंमलबजावणीसाठी चांगल्या पद्धतीने लढत आहेत. जिथे जनसंघटना नाहीत तिथे मात्र

वनअधिकारी आणि महसूल खात्याचे अधिकारी अडचणी निर्माण करतात असे चित्र दिसत आहे. देशाच्या अनेक जिल्ह्यात नक्षलवादी चळवळ वाढते आहे. माजी पंतप्रधान मनमोहनसिंग यांनी ‘ नक्षलवाद हा देशाच्या आंतरिक सुरक्षिततेला असलेला धोका आहे’  असे विधान केले होते. आधी लिहिल्याप्रमाणे जंगल आणि जंगलाखालची खनिजसंपत्ती बहुराष्ट्रीय कंपन्यांना नफेखोरीसाठी देण्याचे सर्वच सरकारांचे धोरण राहिले आहे. आदिवासी समाज त्याला विरोध करतो आहे आणि करणारच. दुर्गम आदिवासी भागात विकास नावालाही नाही. महाराष्ट्राचे गृहमंत्री आर. आर. पाटील एकदा म्हणाले होते, नक्षलवाद जंगलात जन्मत नाही तर मुंबईच्या मंत्रालयात पैदा होतो यात खूपच तथ्य आहे. आदिवासी समाजाला विश्वासात घेत पेसा कायद्याची व वनाधिकार कायद्याची नीट अंमलबजावणी करत, आदिवासी विकासाचा निधी प्रामाणिकपणे त्याच कारणासाठी खर्च केला तर नक्षलवादावरही उत्तर मिळू शकेल.

• •

# मुस्लीम आरक्षणाचा पेच

सच्चर समिती अहवालानुसार काही बाबतीत मुस्लीम समाजाची स्थिती ही अनुसूचित जातींपेक्षाही खराब आहे. शिक्षण, नोकर्या, बँकांचे कर्ज, सरकारी योजनांचे लाभार्थी अशा सर्वच ठिकाणी मुस्लीम समाज मागे आहे. जिल्हा परिषद, विधानसभा, लोकसभा अशा सर्वच प्रतिनिधिगृहात मुस्लिमांचे प्रतिनिधित्व नगण्य आहे. या समाजातील बहुसंख्य लोक आज उपेक्षा आणि अविश्वासाच्या वातावरणात जगत आहेत. त्यातूनच समाजातील तरुण भरकटून चुकीच्या मार्गाला लागत आहेत. दहशतवादी संघटना याचा फायदा घेऊन मुस्लीम तरुणांची माथी भडकवण्याचा प्रयत्न करतात. जिहादचा चुकीचा अर्थ त्यांना सांगत त्यांना दहशतवादाच्या मार्गाला लावतात. जे दहशतवादाच्या मार्गावर आहेत त्यांना समजावून रोखले पाहिजे. जे दहशतवादी कृत्यात सामील आहेत त्यांना कठोर शिक्षा झालीच पाहिजे.

भारतात दहशतवाद हा काही एकाच धर्माच्या नागरिकांचा सहभाग असलेला विषय नाही. मालेगाव बॉम्बस्फोट आणि समझौता एक्स्प्रेस बॉम्बस्फोट खटल्यात ज्या पद्धतीने साध्वी प्रज्ञासिंग, कर्नल पुरोहित हे पकडले गेले आणि राष्ट्रभक्त अधिकारी हेमंत करकरे यांनी ज्या पद्धतीने त्याबाबतचे पुरावे समोर आणले त्याने हे आता सिद्ध झाले आहे; पण दहशतवादाच्या तपासाबाबत तपासयंत्रणा पक्षपातीपणे वागतात याचा एक खोलवर परिणाम मुस्लीम तरुणावर होत आहे. या पार्श्वभूमीवर मुस्लीम आरक्षणाची मागणी समजून घेतली पाहिजे. सरसकट धर्माच्या आधारे आरक्षण संविधानाला मंजूर नाही. त्या समाजातील थोडे पुढारलेले लोक स्वार्थासाठी आम्ही सर्व एकच अशी भूमिका घेऊन सर्वांसाठी आरक्षण मागतात या पार्श्वभूमीवर जे न्यायालयात टिकत नाही. तत्त्वतः इस्लाममध्ये जातीप्रथा नसली तरी व्यवहारात भारतीय मुस्लीम समाजात जाती आहेत. त्यामुळे त्या त्या प्रवर्गाच्या समकक्ष जे जातीसमूह मुस्लीम समाजात आहेत त्यांना त्या त्या जातींचे दाखले देण्याची व्यवस्था प्राधान्याने करून त्या त्या प्रवर्गातील आरक्षण त्यांना मिळेल अशी व्यवस्था केली पाहिजे. लोकनियुक्त सभागृहात मुस्लीम समाजाचे प्रतिनिधित्व वाढावे यासाठी सर्वच राजकीय पक्षांनी अधिक संख्येने मुस्लीम उमेदवारांना उमेदवारी दिली पाहिजे.

• •

# महिला आरक्षणाचा तिढा आपण कधी सोडविणार?

संसदेत सर्वांत अधिक काळ प्रलंबित असलेले विधेयक हे बहुतेक महिला आरक्षणाचे असावे. अनेक प्रश्नावर भांडणारे वेगवेगळ्या राजकीय पक्षांचे सदस्य या मुद्द्यावर एकत्र येतात आणि महिला आरक्षणाचे विधेयक हाणून पाडतात.स्थानिक स्वराज्य संस्थात अनेक महिला प्रतिनिधींनी आपले कर्तृत्व आणि क्षमता सिद्ध केली आहे. त्यांना आता पुढील संधी विधानसभेत, लोकसभेत मिळाली पाहिजे. काही सावित्रीच्या लेकी सर्व क्षेत्रात आत्मविश्वासाने भरारी घेत असताना बाकीच्या अनेकजणी आज संधीपासून वंचित आहेत. काहीजणींना तर जन्माला यायची संधीही नाकारली जात आहे. ही परिस्थिती बदलण्यासाठी आता सावित्रीच्या लेकींना देश-राज्ये चालविण्याच्या

जबाबदारीतही सहभागी करून घेतले पाहिजे. संसदेतील काही पुरुष सदस्य महिला आरक्षण विधेयकात काही बदल मागत आहेत. त्यांचे म्हणणे आहे महिलांना 33 टक्के आरक्षण देताना त्या तेहेतीस टक्क्यातील विविध सामाजिक गटातील महिलांचा त्यातील हिस्सा आत्ताच नक्की करा. म्हणजे सरसकट महिलांना तेहेतीस टक्के आरक्षण असे न म्हणता त्या तेहेतीस टक्क्यात अनुसूचित जाती, अनुसूचित जनजाती, इतर मागासवर्गीय आणि सर्वसाधारण गटातील महिलांचे प्रमाण कायदा करतानाच नक्की करा. ही मागणी योग्यच आहे अन्यथा आत्ता सत्तेत असलेल्या घराण्यातील महिलांनाच फक्त संधी मिळण्याची जास्त शक्यता आहे. वरील बदल महिला आरक्षण विधेयकात करणे फार अवघड नाही. अनुसुचीत जाती आणि अनुसुचित जमातींसाठी आता जे आरक्षण प्रत्यक्षात आहे त्यातूनच अनुसुचित जाती व अनुसुचित जनजातीच्या महिलांना 33% आरक्षण मिळेल. ओ.बी.सी. महिलांसाठी फक्त वेगळी तरतूद करावी लागेल. त्या कारणासाठी हे विधेयक लांबणीवर टाकणे योग्य नाही. महिला आरक्षण विधेयक लवकरात लवकर मंजूर झाले पाहिजे. • •

# मराठा-पटेल-जाट आरक्षणाची मागणी आणि संविधान

मराठा, पटेल आणि जाट अशा मध्यम जातीतून आरक्षणाच्या मागण्या पुढे येत आहेत. कुणबी शेतकरी मोठ्या प्रमाणावर आत्महत्या करत आहेत. शेतीतील सार्वजनिक गुंतवणूक कमी होत आहे. त्यामुळे शेती आहे त्यांनाच जगवू शकत नाही. शेतीची उपेक्षा आणि उद्योगांना पायघड्या या धोरणाने शेती आणि शेतकरी उध्वस्त होत आहेत. मराठा समाजात रुपयातला बारा आणे समाज अल्पभूधारक, कोरडवाहू गरीब शेतकरी आहे. तो आज प्रचंड अडचणीत आहे. गरिबीमुळे चांगले शिक्षण नाही. चांगले व्यावसायिक शिक्षण नाही म्हणून नोकर्या नाहीत. नोकर्या नाहीत म्हणून पुढचे रस्ते सापडत नाहीत. गावात राहिले तर गावकरी नको नको ते प्रश्न विचारून हैराण करतात. आई जेवू घालीना आणि

बाप भीक मागू देईना अशा प्रकारची कोंडी होते. त्यातून हे तरुण शहरात स्पर्धा परीक्षेच्या नावाखाली वर्षानुवर्षे स्पर्धा परीक्षा देत राहतात. सुट्टीत गावी आल्यावर कुणी विचारलेच तर कलेक्टरची परीक्षा देतोय असे सांगतात. वास्तवातील हताशा त्याची त्यालाच माहीत असते. दुसरीकडे रुपयातला चार आणे मराठा समाज सातत्याने सत्तेत आहे पण त्याचा कुठलाच उपयोग अडचणीत असलेल्या मराठा समाजाला होत नाही. आरक्षणाच्या मागणीसाठी मात्र आम्ही सर्व एक असा नारा दिला जातो. अडचणीत असूनही गरीब मराठा समाज उच्चजातीय अस्मितेला सोडायला तयार नाही. शोषित समाज आणि कष्टकर्यांसोबत उभा राहायला तयार नाही. संविधानाने आरक्षणासाठी सामाजिक-शैक्षणिक मागासलेपण हा निकष मान्य केला आहे. संविधानाला आरक्षणासाठी आर्थिक निकष मान्य नाही. त्यामुळे मराठा आरक्षण न्यायालयात टिकत नाही. आरक्षणाच्या बाबतीत लिहिताना संविधान निर्मात्यांनी पर्याप्त प्रतिनिधित्व हा शब्द वापरला आहे हे आपण वरती पहिलेच. हा रुपयातला बारा आणे मराठा समाज गरिबीमुळे खूपच अडचणीत आहे हे वास्तवच आहे पण आज विविध सत्ताकेंद्रात मराठा समाजास पर्याप्त प्रतिनिधित्व आहे की नाही हे जर आपण बघितले तर लक्षात येईलकी पर्याप्त प्रतिनिधित्व आहे.

आर्थिक निकषावर आरक्षण राबविणे अवघड आहे. उत्पन्न लपविता येते. जात सहजासहजी लपत नाही. दारिद्र्यरेषेच्या याद्या बनताना किंवा शिक्षणासाठी ई.बी.सी. सवलतीचे प्रमाणपत्र मिळताना काय होते आपण पाहतोच. हताश झालेला मराठा तरुण आपला राग दलित-मागासवर्गीयांच्या आरक्षणावर काढतो. आम्हाला द्या नाहीतर कोणालाच देऊ नका असे म्हणत सामाजिक न्यायाचे तत्वच मोडीत काढायला निघतो. सत्तेत मश्गूल असलेले नेते भडकवत राहतात. हताश मराठा तरुणांना उत्तर नसलेल्या दिशेने ढकलत राहतात. गरीब मराठा तरुणांचे प्रश्न आहेत हे नक्की. पण ते उत्तर चुकीच्या ठिकाणी शोधत आहेत. समाजातील जाणत्यांनी आणि आरक्षण समर्थकांनीसुद्धा या तरुणांशी संवाद वाढविला पाहिजे.

खरेतर अशा मध्यम जातीतून वाढत्या संख्येने येणार्या आरक्षणाच्या मागण्या या शेतीक्षेत्रातील पेचप्रसंगाची साक्ष आहेत. उद्योगांच्या तुलनेतील शेतीची उपेक्षा थांबविणे, शेतीतील सार्वजनिक गुंतवणूक वाढविणे, पाणी,वीज, खते, बियाणे, कीटकनाशके ही परवडणार्या दरात उपलब्ध करणे, शेतीसाठी रास्त दरातील कर्ज उपलब्ध करून देणे आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे उत्पादनखर्चावर आधारित हमीभाव शेतकर्यांना मिळेल अशी व्यवस्था उभी करणे इथपासून सुरुवात करावी लागेल. शेतीमाल प्रक्रिया उद्योगातून ग्रामीण भागाची क्रयशक्ती आणि तेथील रोजगार वाढविला पाहिजे. त्याचबरोबर आधी लिहिल्याप्रमाणे सरकारी नोकर्यांचा टक्का वाढविणार्या आर्थिक धोरणांचा आग्रह धरला पाहिजे. आणि हे सर्व तातडीने होण्याची गरज आहे. वाढत्या संख्येने होणार्या शेतकरी आत्महत्यांनी वाजविलेली धोक्याची घंटा हा गंभीर सामाजिक आजाराचा इशारा आहे, तो आपण नीट समजून घेऊन त्यावर उपाय शोधले पाहिजेत.

खरे म्हणजे आरक्षणाच्या बाबतीत खाणारे शंभर आणि भाकरी दहा ही परिस्थिती कायम अशीच राहणार असे गृहीत धरून असलेल्या दहा भाकरी कोण खाणार असा प्रश्न आपण उपस्थित करतो आणि मग आपापसात भांडत बसतो. पण खाणारे शंभर असतील तर भाकरी शंभर का बनत नाहीत असा प्रश्न सर्वांनी मिळून सरकारला का विचारायचा नाही? म्हणून सर्वांना चांगले शिक्षण आणि सर्वांना सक्षम रोजगार ही लढाई आणि त्यासाठीच्या आर्थिक धोरणांचा आग्रह आपण धरला पाहिजे. अशा धोरणांच्या प्रामाणिक अंमलबजावणीमुळेच भविष्यात आरक्षणाची गरज संपण्याची शक्यता आहे.

• •

# केंद्र-राज्य संबंध

भारतीय संविधानाने संघराज्य पद्धती स्वीकारली आहे. वेगवेगळी राज्ये आणि केंद्रशासित प्रदेश मिळून भारत देश बनला आहे. केंद्र आणि राज्ये यांच्यात

कायदे करण्याबाबतच्या अधिकारांचे वाटप निश्चित केले आहे. सातव्या अनुसूचितील संघसुचीमध्ये केंद्राच्या अधिकारक्षेत्रातील विषयांची यादी आहे. त्याचबरोबर राज्यसुचीमध्ये राज्याच्या अधिकारक्षेत्रातील विषयांची यादी दिलेली आहे. तिसरी सूची ही समवर्ती सूची आहे ज्यात अशा विषयांची यादी आहे ज्याबाबत केंद्र आणि राज्य दोघांचाही कायदे करण्याचा अधिकार असेल मात्र समवर्ती सूचीतील विषयासंदर्भात केंद्र आणि राज्याच्या कायद्यात विसंगती असेल तर केंद्राचा कायदा प्रभावी असेल. वरील तीनही सुचीत समाविष्ट नसलेल्या विषयाबाबत कायदे करण्याचा अधिकार संसदेचा असेल. आणीबाणी जाहीर केलेल्या काळात राज्यसुचीतील कोणत्याही विषयांबाबत कायदे करण्याचा अधिकार संसदेला असेल. संविधानाच्या भाग 12 मध्ये कलम 268 ते 281 नुसार केंद्र आणि राज्ये यांच्यातील महसुलाचे वाटप निश्चित केले आहे. सध्या मंजुरीच्या प्रक्रियेत असलेल्या जी.एस.टी. बिलाने या रचनेची नियमावली आता बदलेल.

थोडक्यात केंद्र सरकारकडे अधिक अधिकार असणारे किंवा मजबूत केंद्र सरकार असलेली संघराज्य पद्धती आपण स्वीकारली आहे. संविधान बनत असताना देश फाळणीच्या जखमा आणि वेदना सहन करत होता. आपला देश अनेक धर्म आणि हजारो जातींचा बनला आहे. अनेक भाषा बोलणारे लोक या देशात राहतात. स्वाभाविकपणे या सर्वांच्या भोवती फिरणारे अस्मितेचे राजकारण संविधान बनतानाही होते, आज ते अधिक वाढले आहे. त्यामुळे देशाची एकता आणि अखंडता अबाधित ठेवण्यासाठी केंद्र सरकारकडे अधिक अधिकार असावेत असे संविधान निर्मात्यांना वाटणे स्वाभाविक आहे. संविधानसभेत काही सदस्यांनी याबाबत नाराजी व्यक्त करत राज्यांना अधिक अधिकार देण्याची मागणी केली होती. याबाबत बाबासाहेबांनी संविधान सभेतील आपल्या अखेरच्या भाषणात स्पष्टीकरण दिलेले दिसते. आजही सरकारिया आयोगाच्या अहवालाचा संदर्भ देऊन पंजाब, तामिळनाडू आणि अन्य राज्ये राज्यांना अधिक अधिकार देण्याची मागणी करत असतात.

सर्वच पक्षांच्या केंद्र सरकारांनी राज्यपाल हे पद राजकीय हस्तक्षेपाचे साधन बनविले आहे. अनेक राज्यपालांनी पदाच्या घटनात्मक मर्यादा ओलांडून संविधानातील 356व्या कलमाचा दुरूपयोग करताना नको ते उपद्व्याप करत राज्य सरकारांना त्रास दिल्याने त्या त्या राज्यात केंद्र सरकारच्या अनावश्यक हस्तक्षेपाबद्दल असंतोष आहे. संविधान निर्मात्यांची भावना योग्यच होती; पण प्रत्येक बाबतीत पक्षीय स्वार्थ पाहण्याच्या वृत्तीने गडबड होत आहे. त्या त्या राज्यातील वैशिष्ट्यपूर्ण परंपरा, वारसा आणि सांस्कृतिक महत्त्व आणि विकासाच्या आकांक्षा यांना योग्य प्रतिसाद केंद्राने द्यावा आणि राज्यांनी आपल्या रास्त अस्मिता जोपासताना भारतीयत्वाचे भान कधीही सुटू देऊ नये, असा समतोल सांभाळला तर भारत एक राष्ट्र बनण्याची प्रक्रिया वेगाने पुढे जाऊ शकते, त्यासाठी संविधानातील तरतुदी पूरक आणि योग्यच आहेत.

• •

# काश्मीरचा प्रश्न आणि 370 वे कलम

भारत स्वतंत्र होत असताना तो एकसंध राहणार नाही, त्याचे तुकडे होतील याची पुरेपूर काळजी इंग्रजांनी घेतली. त्यांनी केवळ फाळणी केली असे नव्हे तर भारतातील संस्थाने त्यांच्या मर्जीप्रमाणे निर्णय करू शकतील अशी तरतूदही स्वातंत्र्य देतानाच ते करून गेले. स्वातंत्र्यलढ्याच्या नेत्यांनी फाळणी टाळण्याचा अटोकाट प्रयत्न केला; परंतु बॅरिस्टर महंमद अली जीना यांचा अतिमहत्त्वाकांक्षी आणि हटवादी स्वभाव आणि त्याला इंग्रजांनी घातलेले खतपाणी याने परिस्थिती चिघळत गेली. जीनांच्या डायरेक्ट ॲक्शनच्या आवाहनाने देशात हिंसाचार वाढत गेला. दुसर्या बाजूला स्वातंत्र्यलढ्यापासून लांबच राहिलेल्या हिंदुत्ववाद्यांनी आगीत तेल ओतायचे काम केले. नेहमी घडते त्याचप्रमाणे वरकरणी एकमेकाच्या विरोधात लढत आहेत असे भासणार्या मुस्लीम कट्टरतावाद्यांनी आणि हिंदू कट्टरतावाद्यांनी प्रत्यक्षात एकमेकाला पूरक भूमिका घेतली. स्वातंत्र्यलढ्याच्या नेत्यांनी हतबल होत नाइलाजाने फाळणी स्वीकारली. देशाच्या फाळणीच्या सर्वमान्य सूत्राप्रमाणे काश्मीर संस्थानाचे राजे हरीसिंग यांनी काश्मीर स्वतंत्र

राहू शकते का हा प्रयत्न सुरू केला. पाकिस्तानी सरकारची याबाबत काही मदत होऊ शकते का याची चाचपणी सुरू केली. सीमेवरचे संस्थान असल्याने काश्मीरचे महत्त्व ओळखून काश्मीर हा भारताचा भाग बनावा यासाठी जवाहरलाल नेहरू प्रयत्न करत होते. काश्मिरी जनतेचे नेते शेख अब्दुल्ला हे राजा हरीसिंगांच्या तुरुंगात होते. काश्मीर हा भारताचा भाग बनावा या मताचे ते होते. (पुढे स्वातंत्र्योत्तर भारतातही पंडीत जवाहरलाल नेहरु पंतप्रधान असताना शेख अब्दुलांना तुरुंगात टाकावे लागले होते.) एवढ्यात पाकिस्तानने काश्मिरात घुसखोरांच्या टोळ्या आणि त्यामागून सैन्य घुसवले. अशा तणावाच्या प्रसंगात राजा हरीसिंगाने मग भारताची मदत मागितली. भारतात सामील होण्याच्या बदल्यात काश्मीरसाठी विशेष दर्जाची मागणी हरीसिंगांनी केली. भारताने पाकिस्तानी आक्रमणापासून काश्मीर वाचवले; पण आंतरराष्ट्रीय शिष्टाईतून युद्ध थांबले तेव्हा एकतृतीयांश काश्मीर पाकिस्तानच्या ताब्यात राहिला. काश्मीरला विशेष दर्जा देणारे 370 वे कलम या विशिष्ट परिस्थितीमुळे अस्तित्वात आलेले आहे. भारतीय संविधान आणि काश्मीरचे संविधान यांना जोडणारा दुवा म्हणून 370व्या कलमाकडे पहिले जाते. इथे एक गोष्ट नमूद केली पाहिजे की काश्मीरबाबत सुरुवातीच्या काळात अस्तित्वात असलेल्या काही विशेष तरतुदी उदाहरणार्थ पोलीस अधिकार्यांच्या नियुक्त्या स्वतंत्रपणे, स्वतंत्र निवडणूक आयोग या आज अस्तित्वात नाहीत. भारतातील अन्य राज्यांप्रमाणेच आज तिथे याबाबतची व्यवस्था आहे. इंदिरा गांधींच्या काळात कुठलाही गाजावाजा न करता हे घडले आहे.

आपण 370 व्या कलमाची भरपूर चर्चा करतो; परंतु त्यानंतर लगेचच अन्य काही कलमांच्यामध्ये इतर काही राज्यांनाही त्यांची वैशिष्ट्यपूर्ण परिस्थिती लक्षात घेऊन विशेष तरतूदीची व्यवस्था संविधानाने सुचविलेली आहे हे आपण वाचतही नाही. महाराष्ट्र व गुजरात (371), नागालँड (371 क), आसाम (371 ख), मणिपूर (371 ग), आंध्र प्रदेश (371 घ), सिक्कीम (371 च), मिझोराम (371 छ), अरुणाचल प्रदेश (371 ज), गोवा (371 झ), कर्नाटक (371 ट) अशा कलमांमधून त्या त्या राज्यांसाठी विशेष तरतूदीची व्यवस्था संविधानात करण्यात आली आहे. अर्थातच 370 वे कलम व 371 कलमाचे हे सर्व भाग सारखेच आहेत असे म्हणता येणार नाही. त्या त्या राज्याची वैशिष्ट्यपूर्ण परिस्थिती लक्षात घेऊन ही कलमे आलेली आहेत हा संदर्भ 370 व्या कलमाची चर्चा करताना लक्षात घेतले पाहिजे.

आज काश्मीरचा प्रश्न पुन्हा पेटला आहे. पीडीपी-भाजप युतीच्या सरकारला परिस्थिती नीट न हाताळता आल्याने तो पेटला आहे. आपल्यापैकी काहीजण काश्मीरबाबत खूप चिंतीत असतात. काश्मीर हा भारताचा अविभाज्य भाग आहे ही भारताची भूमिका आहे आणि ती योग्यच आहे. आत्तापर्यंत झालेल्या अनेक निवडणुकांमध्ये काश्मिरी जनतेने मतदान करून त्यांना भारतातच राहायचे आहे हे दाखवून दिले आहे; पण आपल्याला हे एकदा नक्की केले पाहिजे की आपल्याला काश्मीर हवा आहे म्हणजे केवळ काश्मीरचा भूभाग हवा आहे की काश्मिरी जनतेसह काश्मीर हवा आहे. पाकिस्तानने त्या भागात तीन युद्धे आपल्यावर लादली. त्या युद्धकाळात काश्मीर भारतातच राहावे यासाठी सर्वांत जास्त नुकसान काश्मिरी लोकांनीच झेलले आहे. आजही दहशतवादाच्या माध्यमातून पाकिस्तानने आपल्यावर लादलेल्या छुप्या युद्धाचा जास्त त्रास काश्मिरी लोकच सहन करत आहेत. अशा वेळी आपण काश्मीरची वेगळी अडचणीची भौगोलिक परिस्थिती, काश्मीरची वैशिष्टयपूर्ण संस्कृती (काश्मिरीयत) आणि काश्मीरचा खूपच मागे राहिलेला विकास याची नीट माहिती घेऊन काश्मिरी जनतेशी नाते जोडायचा प्रयत्न केला पाहिजे. काश्मीर हा काश्मिरी जनतेसह भारताचा भाग राहिला पाहिजे. • •

# कायदेमंडळ, न्यायपालिका आणि कार्यकारी मंडळातील अधिकारांचे संतुलन

कायदेमंडळ, न्यायपालिका आणि कार्यकारी मंडळ हे संसदीय लोकशाहीचे महत्त्वाचे घटक. यांच्यातील अधिकारांचे योग्य संतुलन संविधानाने साधले आहे. प्रत्येक घटकाला आपले काम मोकळेपणाने करता यावे आणि कुठलाही एक घटक निरंकुश सत्तेकडे जाणार नाही अशा प्रकारचे हे संतुलन आहे. संसदेला कायदा करण्याचा अधिकार आहे. तो कायदा संविधानाशी सुसंगत आहे की नाही ते तपासण्याचा आणि कायद्याचा अर्थ लावण्याचा अधिकार न्यायालयाला आहे. कार्यकारी मंडळाचे घटनात्मक प्रमुख राष्ट्रपती आहेत आणि त्यांच्या निवडीनंतर त्यांना शपथ देण्याचे काम सर्वोच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश करतात. राष्ट्रपतींना सल्ला देण्यासाठी मंत्रिपरिषद असते आणि तिचे प्रमुख पंतप्रधान

असतात. देशाचा कारभार मंत्रीपरिषदेच्या सल्ल्याने आणि राष्ट्रपतींच्या नावे चालतो. मंत्रिपरिषदेचा सल्ला एकदा परत पाठविण्याचा अधिकार राष्ट्रपतींना असतो पण मंत्रिपरिषदेने दुसर्यांदा तोच सल्ला पाठविला तर राष्ट्रपतींवर तो बंधनकारक ठरतो. राष्ट्रपती किंवा सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश चुकीचे वागले तर त्यांना महाभियोग नावाच्या विशिष्ट प्रक्रियेने काढून टाकण्याचा अधिकार संसदेला असतो. काहींना असे वाटते की एकाचे पाय दुसर्याच्या पायात अडकविणारी ही पद्धती आहे; पण तसे मानायची गरज नाही. लोकशाही व्यवस्थेचे हे वैशिष्ट्य आहे. कुठलीही संस्था निरंकुश बनून तिने नागरिकांचे मूलभूत अधिकार धाब्यावर बसवू नयेत हा त्यातील हेतू आहे. इंग्रजीमध्ये याला चेक्स अँड बॅलंसेस असा समर्पक शब्द आहे. लोकशाही व्यवस्थेत सर्वांनी आपले घटनात्मक अधिकार प्रभावीपणे वापरून सक्रियपणे काम करणे जसे अपेक्षित आहे तसेच आपापल्या घटनात्मक मर्यादेत राहणे हे ही अपेक्षित असते. समतोल आणि संतुलित वृत्तीने काम केल्याशिवाय लोकशाही यशस्वी होऊच शकत नाही. अलीकडील काळात हे संतुलन बिघडते आहे की काय असे वाटते. थोडेफार वादविवाद आणि त्यातून झालेला संवाद लोकशाहीला अधिक समृद्ध करेल पण हे करताना त्या त्या संस्थेची घटनात्मक मर्यादा प्रत्येकाने सांभाळावी एवढेच.

• •

# संसदीय लोकशाही

भारतीय संविधानाने संसदीय लोकशाहीचा स्वीकार केला आहे. ग्रामपंचायतीपासून ते लोकसभेपर्यंत मतदार आपले प्रतिनिधी निवडून देतात. हे प्रतिनिधी त्या त्या लोकनियुक्त सभागृहात मतदारांच्या वतीने भूमिका बजावतात. पाच वर्ष पूर्ण झाले की पुन्हा येणार्या निवडणुकीत मतदारांना कौल मागतात. अलीकडे धनशक्ती, गुंडशक्ती आणि जात-धर्माचे आवाहन यांनी निवडणुकांचे निकाल प्रभावित होण्याचे प्रमाण वाढले आहे. अनेक पक्ष आणि अपक्ष उमेदवारांमुळे अतिशय कमी मते मिळालेला उमेदवार सर्व सर्व मतदारांचा

प्रतिनिधी ठरतो. (फर्स्ट पास्ट पोस्ट पद्धती) त्यामुळे निवडणुकांतील काळ्या पैशाचा प्रभाव कमी करण्यासाठी सरकारनेच उमेदवारांचा प्रचारखर्च उचलावा इथपासून ते प्रमाणशीर प्रतिनिधित्वाची पद्धती आणावी अशा अनेक निवडणूक सुधारणांची मागणी अनेकजण करत आहेत. निवडणुकीचा अर्ज भरताना उमेदवारांनी भरलेले संपत्ती व उत्पन्नाच्या स्रोतांची शपथपत्रे निवडणूक आयोगाकडे पडून राहतात. ती तपासण्याची यंत्रणाही असायला हवी. माजी मुख्य निवडणूक आयुक्त एस. वाय. कुरेशी यांच्या काळात निवडणूक आयोगाने सरकारकडे निवडणूक सुधारणांच्या संदर्भात काही सूचना पाठविल्या होत्या. याबाबत सर्वांच्या विचारविनिमयातून पण लवकरात लवकर निर्णय घेतला पाहिजे. आपल्या निवडणुका हायजॅक होतात ही प्रामाणिक मतदारांच्या मनातील भावना दूर करण्याचा प्रयत्न झाला पाहिजे.

प्रातिनिधिक लोकशाहीकडून सहभागी लोकशाहीकडे

मतदार प्रतिनिधी निवडून पाठवितात, त्या प्रतिनिधींनी आपल्या मतदारांना जबाबदार राहणे अपेक्षित असते. पण आजच्या व्यवस्थेत ते होताना दिसत नाही. लोकशाहीत मतदार हा महत्त्वाचा असतो हे चित्र आज दिसत नाही. प्रतिनिधी सर्वाधिकारी बनतात. अपवादात्मक लोकप्रतिनिधी वगळता बहुसंख्य लोकप्रतिनिधी नवे संस्थानिक बनल्याचा अनुभव मतदार घेत आहेत. पाच वर्षातून एकदा मतदान करणे एवढेच काम मतदारांना असते. अर्थात व्यवस्थेचा प्रभावच असा पडत जातो की, अनेक मतदारांनाही स्वतःला काहीच करावे न लागता आपोआप सर्व घडावे असे वाटते. मतदारातील या प्रवृत्तीला लोकप्रतिनिधी खतपाणी घालतात हेही खरेच आहे. माझ्यावर सर्व सोपवा असे आश्वासन निवडणुकीतील उमेदवार देतात. पुढे निवडून आल्यावर करत काहीच नाहीत. अनेक संस्थांचे किंवा मंडळांचे पदाधिकारी लोकप्रतिनिधीच्या दरबारात हजेरी लावून मिळेल ती खिरापत पदरात पाडून घेतात. उत्सव, जयंत्या या लोकवर्गणीतून, काटकसरीने आणि पारदर्शीपणे न करता त्या धूमधडाक्यात साजर्‍या करण्यासाठी लोकप्रतिनिधींना एकरकमी देणग्यांसाठी छळतात. काही

लोकप्रतिनिधींनाही हेच आपले महत्त्वाचे काम वाटते, मिरविण्याची हौस भागून घेणे बरे वाटते. या सर्वांतून प्रातिनिधिक लोकशाहीचे फारच चुकीचे स्वरूप आज बनले आहे. प्रातिनिधिक लोकशाहीला सहभागी लोकशाही बनवायचे असेल तर दोन मतदानांच्या मधल्या पाच वर्षात मतदाराला काम हवे आहे. निर्णयप्रक्रियेत संधी आणि अंमलबजावणीत सहभाग हवा आहे. इच्छाशक्ती असेल तर हे अनेक प्रकारे करता येईल.

* विधानसभा, लोकसभेच्या अधिवेशनाच्या आधी आमदार-खासदारांनी मतदारांच्या बैठका घेऊन अधिवेशनातील चर्चेचे विषय, विधेयके याबाबत मतदारांना माहिती देऊन त्याबाबतचे त्यांचे मत आजमावणे.

* अधिवेशनानंतर पुन्हा मतदारांच्या बैठका घेऊन झालेले निर्णय आणि लोकप्रतिनिधीने स्वतः काय केले, काय भूमिका घेतल्या याची माहिती देणे.

* नवीन कायदा बनविण्याचा प्रस्ताव देण्याचा अधिकार सध्या मंत्रिपरिषदेस अथवा खाजगी विधेयकाद्वारे लोकप्रतिनिधीस आहे. हा अधिकार मतदारांनाही देता येऊ शकतो. विशिष्ट टक्के मतदारांनी जर सह्या करून एखाद्या कायद्याची मागणी केली तर अशा कायद्याचा प्रस्ताव चर्चेस घेण्याचे बंधन लोकप्रतिनिधीगृहावर असले पाहिजे. कायदा मंजूर अथवा नामंजूर करण्याचा अंतिम अधिकार संसद व विधानमंडळाकडेच असला पाहिजे.

सर्वांत महत्त्वाचे म्हणजे स्थानिक स्वराज्य संस्थांना आणि ग्रामसभा, मोहल्लासभांना अधिक अधिकार देणे हे गरजेचे आहे. 73 व्या व 74 व्या घटनादुरुस्तीद्वारे पंचायतराज बळकट करण्याच्या दृष्टीने काही पावले उचलली आहेत; पण त्या उपाययोजना अपुर्या आहेत. ग्रामसभांना आपल्या कार्यक्षेत्रात स्वतःसाठी महसूल गोळा करण्याचे अधिकार, राज्याकडून अधिक महसूल मिळविण्याचे अधिकार, गावाच्या कार्यक्षेत्रातील सरकारी कर्मचार्यांच्या

नेमणुकीचे आणि त्यांच्यावर नियंत्रण ठेवण्याचे अधिकार, आधीच ठरलेल्या योजनांचे लाभार्थी निवडण्याच्या अधिकारापेक्षा गावातील लोकांच्या गरजेनुसार विकासकामे ठरविण्याचा, ती कामे पूर्ण करून घेण्याचा, त्या कामांच्या गुणवत्तेची तपासणी करून ठेकेदाराची बिले मंजूर करण्याचे अधिकारसुद्धा ग्रामसभांना असावेत. अर्थातच दोन गावाशी संबंधित प्रश्न असतील तर त्यापुढील स्थानिक स्वराज्य संस्थेकडे निर्णयाचे अधिकार असावेत, शहरी भागातील नागरिकांनाही मोहल्लासभेद्वारे असे अधिकार देणे शक्य आहे. आज महानगरपालिकेत निवडून आलेले नगरसेवक आणि महापौर यांच्यापेक्षाही प्रतिनियुक्तीवर आलेल्या राज्यशासनाच्या अधिकार्यांना अधिक अधिकार असतात हे लोकशाहीशी सुसंगत नाही. आता स्मार्ट सिटी प्रकल्पात तर लोकप्रतिनिधींच्या अधिकारांना अजून कात्री लागत आहे हे योग्य नाही. लोकशाही योग्य प्रकारे रुजवायची असेल तर सत्तेचे व निर्णयप्रक्रियेचे विकेंद्रीकरण गरजेचे आहे. काही लोक म्हणतात हे केल्याने गावात गटबाजी, मारामारी वाढेल, भ्रष्टाचार होईल. पण मग आज आपण विधानसभेत, लोकसभेत काय पाहतो? केवळ पक्षीय राजकारण, गोंधळ, हमरीतुमरी, एकमेकाचे कपडे फाडणे हे सर्व विधानसभेत, लोकसभेत घडतेच आहे. आत्ताच्या केंद्रित व्यवस्थेत भ्रष्टाचार थांबला आहे किंवा कमी झाला आहे असा दावा कोणी करू शकेल काय? ग्रामसभा, मोहल्लासभांना अधिक अधिकार दिल्यानंतर गावात, मोहल्लयात काही काळ गोंधळ होईल, भ्रष्टाचार होईलही; पण कदाचित दूरच्या भ्रष्टाचारापेक्षा जवळचा भ्रष्टाचार लोकांना अधिक जाणवेल, टोचेल, गावातला गोंधळ खटकेल. आणि समजा नाही खटकला तर काही वर्षांनी आता आपल्या दुर्गतीसाठी, मागासलेपणासाठी दुसर्याला कोणाला दोष देता येत नाही हे लक्षात आल्यावर तरी लोक जागे होतील. आपल्या विकासासाठी सक्रिय होतील. दरम्यान समाजातील जाणते लोक, नागरी संघटना, स्वयंसेवी संस्था यांनीही लोकांच्या सोबत काम करत लोकशाही व्यवहाराबाबत मतदार सजग होतील, सक्रिय होतील, जागे होतील यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. कमीत कमी दोष असणारी व्यवस्था म्हणून लोकशाहीचा

एकदा स्वीकार केल्यानंतर सतत जागे राहणे ही लोकशाहीची किंमत असते हे आपल्याला समजून घ्यावेच लागेल. स्वातंत्र्यानंतरची अनेक वर्षे काही गोष्टी आपोआप घडतील असे मानून आपण निवांत राहिलो. राज्यघटनेने लोकशाही दिली की लोकशाही आपोआप रुजत नसते. त्यासाठी लोकशाही मूल्यांना पोषक समाजमन घडवावे लागते. मोठ्या प्रमाणावरील कृतिशील प्रबोधन त्यासाठी आवश्यक असते. आपल्या सर्वांना ते आता करावेच लागेल आणि आपण ते नक्की करूया. भारतीय संविधानाचे रक्षण सर्वोच्च न्यायालयाच्या भरवशावर सोडावे की संसदेच्या भरवशावर सोडावे अशी एक चर्चा नेहमी होत असते. संसद आणि सर्वोच्च न्यायालयाला जे करायचे ते करू द्यावे पण स्वतःच्या अधिकारांबद्दल जागरूक आणि कर्तव्यांबद्दल सजग असलेला व सनदशीर जनआंदोलनांद्वारे रस्त्यावर उतरण्याची तयारी असणारा समाजच संविधानातील मूल्यव्यवस्थेचे संरक्षण आणि संवर्धन करू शकेल. एस.एम.जोशी सोशलिस्ट फाउंडेशनच्या संविधान साक्षरता अभियानासाठी बनविलेले हे पुस्तक असा जागृत समाज बनविण्याच्या दिशेने टाकलेले एक पाऊल आहे.

. .